भारतीय रिझर्व बँक
**RESERVE BANK OF INDIA**
**WWW. rbi. org. in**

आरबीआय/२०११-१२/५७
डीबीओडी. क्र. डीआयआर.बीसी.८/१३.०३.००/२०११-१२

जुलै १, २०११
आषाढ १०, १९३३ (शक)

सर्व अनुसूचित वाणिज्य बँका
(आरआरबी सोडून)

महोदय,

महापरिपत्रक - हमी(गॅरंटीज) व सह-स्वीकार (कोऑक्सेप्टन्सेस)

बँकांनी हमी व सहस्वीकर देण्याबाबत संबंधित असलेल्या आमचे महापरिपत्रक डीबीओडी. क्र. सीआयआर. बीसी. १८/१३.०३.००/२०१०-११ दि. जुलै १, २०१० चा कृपया संदर्भ घ्याावा. त्यात जून ३०, २०१० पर्यंत बँकांना दिलेल्या सूचना/ मार्गदर्शक तत्वे अद्यावत करण्यात आली होती. आता हे महापरिपत्रक ह्या विषयावरील जून ३०, २०११ पर्यंतच्या सूचना समाविष्ट करुन अद्यावत करण्यात आले असून ते आरबीआयच्या वेबसाईटवरही (www.rbi.org.in) टाकण्यात आले आहे. सोबत ह्या महापरिपत्रकाची प्रत जोडण्यात आली आहे.

आपला

(पी. आर रवि मोहन)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

सोबत - वरील प्रमाणे.

बँकिंग व्यवहार व विकास विभाग, १३वा मजला, एनसीओबी, शहिद भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१, टेलिफोन क्र :९१-२२-२२६ ०१०००
/ फॅक्स: ९१-२२-२२७ ०१२२४ ईमेल आय डी : cgmicdbodco@rbi.org.in

## अनुक्रमणिका


| परिच्छेद क्र | तपशील |
|---|---|
| अ | उद्देश |
| ब | वर्गीकरण |
| क | मागील सूचना |
| ड | उपयोग |
| १ | प्रस्तावना |
| २ | मार्गदर्शक तत्वे |
| २.१ | सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे |
| २.२ | हमी व्यवहार करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे |
| २.२.१ | अ. प्रतिभूतित अग्रिम राशी व हमींसाठी नॉर्म्स |
| २.२.२ | हमी देतांना घ्यावयाच्या सावधानता |
| २.२.३ | फसवणुकी टाळण्यासाठी सावधगिरि |
| २.२.४ | घोष समितीच्या शिफारशी |
| २.२.५ | अंतर्गत नियंत्रण प्रणाली |
| २.२.६ | बँकेच्या संचालकांच्या वतीने दिलेलया हमी |
| २.२.७ | भारत सरकारची बँक गॅरंटी योजना |
| २.२.८ | शेअर व स्टॉक ब्रोकर्स/कमोडिटी ब्रोकर्सचा वतीने दिलेल्या हमी |
| २.२.९ | कर्ज घेणाऱ्या संस्थांचे संचालक व इतर व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांच्या वैय्यक्तिक हमी घेण्याबाबत मार्गदर्शक तत्वे |
| २.२.१० | राज्य सरकारच्या हमी |
| २.३ | विदेशी मुद्रा व्यवस्थापन (गॅरंटीज्) खाली असलेल्या विनियमानुसार दिलेल्या हमी |
| २.३.१ | निर्यातीसाठी बिड बॉड्स व परफॉर्मन्स बॉड्स किंवा हमी |
| २.३.२ | बँक गॅरंटी देणे |
| २.३.३ | इतर अटी |
| २.३.४ | भारतीय निर्यातदारांच्या वतीने विदेशी मालक/ आयातदारांच्या लाभासाठी विनाअट हमी |
| २.३.५ | प्रकल्प निर्यातीबाबत काही सावधानता |
| २.३.६ | निर्यात-अग्रिम राशींसाठी हमी |
| २.३.७ | बँकेच्या कार्यरीतींचे पुनरावलोकन |
| २.३.८ | विदेशी मुद्रा व्यवस्थापन-नियंत्रित इतर हमी |
| २.४ | आंतर कंपनी ठेवी/कर्जे ह्यासाठीच्या हमींवरील निर्बंध |
| २.४.१ | एनबीएफसीज्मध्ये निधी ठेवण्यासाठीच्या हमींवरील निर्बंध |
| २.४.२ | आंतर-संस्था हमींवरील निर्बंध |
| २.५ | आवाहित हमींचे प्रदान |
| २.६ | बिलांचा सह-स्वीकार |
| २.६.१ | सर्वसाधारण |
| २.६.२ | सुरक्षा उपाय |
| २.७ | पतपत्रांच्या बाबतीत घ्यावयाच्या सावधानता |
| जोडपत्र १ | गॅरंटी बॉंडचा आदर्श नमुना |
| जोडपत्र २ | एडींनी आवाहित केलेली एलओयु/हमी/एलओसी |
| जोडपत्र ३ | एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी |

## *महापरिपत्रक - हमी व सह-स्वीकार*

*अ - उद्देश*

*बँकांद्वारे केल्या जाणाऱ्या हमी व्यवहारांबाबत भारतीय रिझर्व बँकेने दिलेले नियम/विनियम/निदेश ह्यांचा आकृतीबंध हे महापरिपत्रक उपलब्ध करुन देते.*

*ब - वर्गीकरण*

*बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करुन भारतीय रिझर्व बँकेने प्रसृत केलेले वैधानिक निदेश.*

*क - मागील सूचना*

*जुलै १ २००८ च्या महापरिपत्रकातील वरील विषयांवरील मागील सूचना ह्या महापरिपत्रकात अद्यावत करण्यात आल्या आहेत.*

*ड - उपयोग*

*प्रादेशिक ग्रामीण बँका सोडून सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांसाठी.*

*रचना*

*१) प्रस्तावना*

*२) मार्गदर्शक तत्वे*

*२.१ सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे*
*२.२ हमींचा व्यवहार करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे*
*२.३ विदेशी मुद्रा व्यवस्थापन(हमी) विनियमांखाली दिलेल्या विनियमांनी नियंत्रित असलेल्या हमी*
*२.४ आंतर कंपनीय ठेवी/कर्जे ह्यांच्या हमींवरील निर्बंध*
*२.५ आवाहित केलेल्या हमींचे प्रदान*
*२.६ बिलांचा सहस्वीकार*
*२.७ पतपत्रांच्या बाबतीत घ्यावयाच्या सावधानता*

*३ जोडपत्रे*

*जोडपत्र १ गॅरंटी बाँडचा आदर्श नमुना*
*जोडपत्र २ एडींनी आवाहित केलेली एलओयु/हमी/एलओसी*
*जोडपत्र ३ एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी*

*१) <u>प्रस्तावना</u>*

*एखाद्या बँकिंग संस्थेची सुस्थिती ठरविण्याचे एक मुख्य मानक म्हणजे केवळ तिचा लाभदायक पोर्टफोलियोच नव्हे तर तिच्या हमी, पतपत्रे इत्यादि सारख्या तिच्या दायित्वांचा आकार व प्रकार होय. व्यवहाराचा एक भाग म्हणून बँका, त्यांच्या ग्राहकांच्या वतीने निरनिराळ्या हेतूंसाठी हमी देत असतात. बँकांद्वारे दिल्या जाणाऱ्या हमी ह्या, कामगिरि बाबतच्या हमी तसेच वित्तीय हमी अशा दोन्हीही प्रकारच्या असतात. अशा हमी करारनाम्यामधील अटींनुसार, म्हणजे प्रतिभूती, परिपक्वता व हेतु ह्यानुसार दिल्या जातात. ताळेबंदामधील व ताळेबंदाबाहेरील जोखमींवरील जोखमी-भार सुरु केल्यामुळे बँका जोखमींबाबत अधिक संवेदनशील झाल्या आहेत. व त्यामुळे बँका त्यांच्या व्यवहारातील जोखमींची रचना अधिक मुत्सद्दीपणाने करु शकतात. हमी व्यवहार करण्यासाठी बँकांनी पुढील मार्गदर्शक तत्वांचे अनुसरण करावे.*

*२) <u>मार्गदर्शक तत्वे</u>*

*२.१ <u>सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे</u>*

*२.१.१ हमी देण्याचा उद्देश विचारात घेता, सर्वसाधारण नियम म्हणून, बँकांनी वित्तीय हमी देण्याचाच व्यवहार करावा आणि कामगिरिसंबंधाने हमी देण्याचा व्यवहार करताना सावधानात बाळगावी.*

*२.१.२ परिपक्वतेबाबत, एक नियम म्हणून, बँकांनी अल्पमुदतीच्या हमी द्याव्यात व दीर्घ मुदतीच्या हमी अन्य संस्थासाठी सोडव्यात.*

*२.१.३ सर्वसाधारणः कोणतीही बँक हमी १० वर्षांपेक्षा अधिक काळासाठी असू नये. तथापि, बँक उद्योगाचा बदलता चेहरा विचारात घेता, म्हणजे निरनिराळ्या प्रकल्पांसाठी बँका १० वर्षांपेक्षा अधिक काळासाठी देत असलेली कर्जे विचारात घेता, १० वर्षांपेक्षा अधिक काळासाठीही हमी देण्याची परवानगी बँकांना देण्याचे ठरविण्यात आले आहे. अशा हमी देतांना, त्यांच्या ॲसेट लायाबिलिटी मॅनेजमेंटवर अशा दीर्घ मुदतीच्या हमींचा काय परिणाम होऊ शकतो हे बँकांनी विचारात घ्यावे. ह्याशिवाय बँकांनी त्यांच्या संचालक मंडळाच्या मंजुरीने योग्य वाटेल असे, १० वर्षांपेक्षा अधिक काळाच्या हमीबाबतचे धोरण बँकांनी तयार करावे.*

*२.२ <u>हमी व्यवहार करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे</u>*

*२.२.१ <u>अप्रतिभूतित अग्रिम राशी व हमींसाठी निकष (नॉर्म्स)</u>*

*जून १७, २००४ पर्यंत बँकांना त्यांच्या अतिप्रभूतित हमींच्या जबाबदाऱ्या अशा प्रकारे ठेवावयाच्या होत्या की, बँकेच्या येणे असलेल्या अप्रतिभूतीत हमींची २० टक्के रक्कम अधिक त्यांनी देलेल्या व येणे असलेल्या अतिप्रभूतित अग्रिम राशींची एकूण रक्कम, तिने दिलेल्या व येणे असलेल्या एकूण अतिप्रभूतित अग्रिम राशींच्या १५ टक्कयांपेक्षा अधिक असू नये. बँकांनी ठरविलेल्या कर्ज धोरणात बँकांना अधिक लवचिकता उपलब्ध व्हावी ह्यासाठी, बँकांची अतिप्रभूतित जोखमीबाबतची वरील मर्यादा काढून घेण्यात आली असून बँकांच्या संचालक मंडळांना अतिप्रभूतित जोखमीबाबतचे धोरण स्वतःच ठरविण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. "अतिप्रभूतित जोखमी" ची व्याख्या म्हणजे, अशी एक जोखीम की जेथे, बँक/मंजुरीप्राप्त मूल्य ठरविणारे/ रिझर्व बँकेचे तपासनीस अधिकारी ह्यांच्याद्वारे मूल्यांकन केलेले त्या अतिप्रभूतीचे वसूली मूल्य सुरुवातीला येणे असलेल्या जोखमीच्या १० टक्कयांपेक्षा अधिक नसेल. ह्या जोखमीमध्ये, सर्व प्रकारच्या फंडेड व अन-फंडेड (अंडर-रायटिंग व तत्सम जबाबदाऱ्यां सह) जोखमी समाविष्ट असतील. "प्रतिभूती" चा अर्थ, बँकेला व्यवस्थित चार्ज केलेली, स्पष्ट व निश्चित प्रतिभूती असा असेल व त्यात, हमी, कंफर्ट लेटर्स, इत्यादींसारख्या अस्पष्ट/अनिश्चित प्रतिभूतींचा समावेश असेल. अतिप्रभूतित अग्रिम राशी काढण्यासाठी परवानगी असलेले सर्व अपवाद काढून टाकण्यात आले आहेत.*

ii*) प्रकाशित झालेल्या ताळेबंदाच्या परिशिष्ट ९ मध्ये प्रतिबींबीत होणाऱ्या असुरक्षित अग्रिम रकमांना निर्देशित करण्यासाठी त्यांच्या द्वारे वित्त सहाय्य केलेल्या प्रकल्पाच्या (संरचनात्मक प्रकल्पांचा आंतर्भाव असलेल्या) संबंधातील अनुषंघिक बँकांवर आकारले जाणारे अधिकार. परवाने, अधिकृतता इ. ना स्पष्ट मालमत्ता गणले जाणार नाही. बँका वार्षिक वेतनाला रस्ते/महामार्ग प्रकल्पांच्या आणि टोल गोळा करण्याच्या अधिकाराच्या*

*प्रकल्पांच्या बाबतीत बिल्ड-ऑपरेट -ट्रान्स्फर (बीओटी)मॉडेल म्हणुन हाताळू शकते, या प्रकल्पांमध्ये , जर बॅंकेला वार्षिक वेतन आणि टोल गोळा करणाचा अधिकार कायदेशिररित्या लागु करता येत असेल, तर जर रहदारीची विशिष्ठ पातळी स्पष्ट सुरक्षा ठेवींच्या स्वरुपात न मिळवता आल्याच्या स्थितीमध्ये, प्रायोजित केलेल्या प्रकल्पाची भरपाई करण्यासाठी तरतुदि केल्या जातात.*

iii. *काढल्या गेलेल्या असुरक्षित अग्रिम रकमांच्या गणनासाठी सर्व सुटिंना मुभा असते.*

*२.२.२ <u>हमी देण्यासाठी पूर्वदक्षता सावधानता</u>*

*ग्राहकांच्या वतीने हमी देतेवेळी बॅंकांनी पुढील पूर्वदक्षता ठेवाव्यात :-*

*१) एक नियम म्हणून, बॅंकांनी मोठ्या रकमांमधील व मध्यम तसेच दीर्घ मुदतीसाठी अतिप्रभूतित हमी देणे टाळावे. त्यांनी विशिष्ट/असे ग्राहकगट आणि/किंवा व्यापार ह्यांनाच जास्तीत जास्त अतिप्रभूतित हमी देणे टाळावे.*

*२) कोणत्याही वैय्यक्तिक घटकाला देलेल्या अतिप्रभूतित हमीची रक्कम ही त्या बॅंकेने दिलेल्या एकूण अतिप्रभूतित हमींच्या रकमेच्या वाजवी प्रमाणात असावी. एखाद्या व्यक्तीच्या वतीने दिलेली हमीही त्या घटकांच्या इक्विटिच्या वाजवी प्रमाणात असावी.*

*३) अपवादात्मक प्रकरणांमध्ये, सरकारी धोरणानुसार डिफर्ड पेमेंट करार केला असलेल्या उत्कृष्ट ग्राहकांना, बॅंका, छोट्या रकमांसाठी, अप्रतिभूतित धर्तीवर डिफर्ड पेमेंट हमी देऊ शकतात.*
iv. *कोणत्याही व्यक्तीगत सभासदाच्या किंवा सभासदांच्या समुहाच्या वतीने कार्यान्वयीत केलेल्या हमी प्रदर्शनाच्या दिलेल्या नियमांप्रमाणे असणे गरजेचे आहे.*

*येथे समजणे आवश्यक आहे की हमी देण्यामध्ये एक अंगभूत जोखमी असते आणि बॅंकेच्या किंवा जनतेच्या हिताच्या दृष्टीने, ग्राहकांना त्यांची दायित्वे अधिक लांबविण्यासाठी किंवा सुलभपणे हमीची सुविधा देता येते म्हणून प्रोत्साहन देणे योग्य ठरणार नाही.*

*२.२.३ <u>फसवणुकी टाळण्यासाठी सावधानता</u>*

*ग्राहकांच्या वतीने हमी देतेवेळी बॅंकानी पुढील सावधानता बाळगाव्यात :-*

*१) वित्तीय हमी देतेवेळी बॅंकांचे ह्याबाबत समाधान झाले असले पाहिजे की त्या हमीखाली बॅंकांना प्रदान करावे लागल्यास, ग्राहक त्याची परतफेड करण्यास समर्थ अशा स्थितीमध्ये आहे.*

*२) कामगिरीबाबतच्या हमी संबंधाने बॅंकांना सावधगिरी बाळगावी आणि त्या ग्राहकाचा पुरेसा अनुभव असावा की जेणे करुन बॅंकेची खात्री होईल की त्या ग्राहकाला आवश्यक तो अनुभव, क्षमता व करारानुसार दायित्वे पूर्ण करण्याची साधने असून तो ह्याबाबत कोणतीही कसुरी करणार नाही.*

*३) ज्या ग्राहकांना बॅंकेची कर्ज सुविधा उपलब्ध नाही अशा ग्राहकांच्या वतीने हमी देण्याचे बॅंकांनी टाळावे.*

*बॅंकांनी अशा ग्राहकांच्या वतीने हमीचे वितरण करणे थांबविले पाहिजे, जे त्यांच्या कडिल क्रेडिट सुविधेचा लाभ घेत नाही आहेत. परंतु सहकारी बॅंकांच्या अशिलांना सहकारी बॅंकांच्या हमीवर अनुसूचित व्यावसायिक बॅंकांकडुन बीजी/एल सी मिळू शकते. अशा स्थितीमध्ये बॅंकांना कर्ज आणि अग्रिम रक्कम कायदा आणि इतर मर्यादांवरील दिनांक १ जुलै २००११ च्या मास्टर सर्क्युलरच्या परिच्छेद २.३.९.२ च्या तरतुदिंमार्फत मार्गदर्शन मिळू शकते. सहकारी बॅंकांकडील उत्तम क्रेडिट मूल्यांकनाची आणि निरीक्षण यंत्रणांची त्याचप्रमाणे तुमच्या अशिलाला जाणण्याची (नो युअर*

*कस्टमर/के वाय सी)दृढ यंत्रणेची हमी बँकांनी करुन घेणे गरजेचे आहे. बीजी/एल सी सहकारी बँकेच्या विशिष्ट अशिलाला देण्याआधी बँकानी या स्थितींसाठी योग्यप्रकारे के वाय सी केले गेल्याची स्वतः समाधान करुन घेणे महत्वाचे आहे.*

*२.२.४ घोष समितीच्या शिफारशी*

*उच्च स्तरीय समितीने (अध्यक्ष, तेव्हाचे आरबीआयचे उप-गव्हर्नर श्री ए. घोष) पुढील शिफारशींचा अंगिकार बँकांनी करावाः-*

*१) असमर्थनीय हमी तसेच खोट्या-बनावट हमी देणे टाळण्यासाठी, आरबीएने सूचित केल्याप्रमाणे हमी ह्या अनुक्रमांकित अशा सिक्युरिटी फॉर्म्समध्ये दिल्या जाव्यात.*

*२) हमी पाठविताना बँकांनी त्यांच्या लाभार्थींना सावधानतेचा इशारा द्यावा की त्यांनी त्यांच्याच हितासाठी, हमी देणाऱ्या बँकांबरोबर त्या हमीचा खरेपणा तपासून पहावा.*

*२.२.५ अंतर्गत नियंत्रण प्रणाली*

*रु. ५०,०००/- व त्यापेक्षा अधिक रकमेच्या बँक हमींवर दोन अधिकाऱ्यांच्या सह्या एकत्रितपणे केलेल्या असाव्यात. आवश्यक वाटल्यास, बँकेचा आवाका व वर्ग ह्यांचा विचार करुन ह्यापेक्षा कमी मर्यादा बँका विहित करु शकतात. अशा प्रणालीमुळे, केवळ एकाच स्वाक्षरीकारामुळे शक्य अशा प्रामाणिकपणा/नेकीच्या अभावामुळे झालेली चुकीची निर्णयक्षमता/जाणीव ह्यामुळे निर्माण झालेल्या चुकीच्या पध्दती/ हानि टाळता येऊ शकतील. त्या निदेशांचा मूल हेतु लक्षात घेऊन बँकानी योग्य अशा प्रणाली विकसित कराव्यात आणि केवळ अपवादात्मक बाबीतच दोन सह्यांची शिस्त न पाळण्याचे ठरवावे. अशा प्रणालीं योग्यता व परिणामकारकता ह्यानां धरुन असल्याची, जवाबदारी तसेच बँकांच्या अधिकारीवर्गद्वारे फसवणुकी न केल्या जाणे व गैरपध्दतींचा अवलंब न केला जाणे ह्याबाबतची जबाबदारी ही त्या बँकेच्या सर्वोच्च व्यवस्थापनाचीच असेल संलेखावर केवळ एकच सही केली जाण्याबाबत अपवाद केला गेला असेल तर, शाखांच्या अंतर्गत तपासणीचे वेळी अशा संलेखांची खास तपासणी छाननी करण्यासाठी बँकांनी एक खास प्रणाली तयार करावी.*

*२.२.६ बँकेच्या संचालकांच्या वतीने द्यावयाच्या हमी*

*२.२.६ १) बँकिंग रेग्युलेशन अधिनियम १९४९ च्या कलम २० अनुसार बँकांना त्यांच्या कोणत्याही संचालकाला किंवा ज्या कंपनी किंवा संस्थेत बँकांच्या संचालकांपैकी कोणताही संचालक भागीदार किंवा हमीदाता आहे अशा कंपनी किंवा संस्थेला कर्ज किंवा अग्रिम राशी देण्याची मनाई करण्यात आली आहे तथापि, ज्यात हमी देण्याचा समावेश आहे अशा काही सुविधा मात्र ह्या कलम २० च्या अर्थाखाली " कर्जे व अग्रिम राशी" म्हणून समजल्या जात नाहीत. ह्या बाबतीत, संचालकाच्या वतीने हमी देण्याऱ्या बँकांच्या बाबतीत ह्याची खास नोंद घेण्यात यावी की, मुख्य कर्जदाराने त्याचे दायित्व पूर्ण करण्यामध्ये कसुरी केली असल्यास व बँकेला त्या हमी खाली तिच्या दायित्वाचा मान राखण्यास सांगितले गेल्यास, ती बँक व तो संचालक ह्यामधील संबंध धनको व ऋणको असा होऊ शकतो, ह्याशिवाय, त्या बँकेने दिलेल्या हमीवर संचालक तिसऱ्या पक्षाकडून कर्ज मिळवून कलम २० ची तरतुद टाळू शकतात. बँकांनी जर ह्या कलमाखाली त्यांच्यावरच हस्तांतरित केल्या जाऊ शकतात. ह्याबाबत बँकांनी योग्य ती पाउले न उचलल्यास अशा प्रकारच्या व्यवहारांमुळे कलम २० ची अंमलबजावणी करण्याच्या हेतुच पराभूत होतो.*

*२.२.६ २) वरील बाबीच्या विचार करता, बँकांनी संचालकांच्या वतीने व ते संचालक असलेल्या कंपन्याच्या वतीने हमी इत्यादि, निधीवर आधारित नसलेल्या सुविधा देऊ करतेवेळी खात्री करुन घ्यावी की--*

*१) ज्या पक्षाच्या वतीने हमी देण्यात आली होती त्या पक्षाकडून स्वतःच्याच स्त्रोतांमधून दायित्वे/ जबाबदाऱ्या पूर्ण केल्या जातील ह्याबाबतच्या सुयोग्य व परिणामकारक व्यवस्था केल्या असल्याबाबत बँकेचे पूर्ण समाधान आलेले आहे.*

*२) ती हमी आवाहित केली गेल्यास, ती जबाबदारी पूर्ण करण्यासाठी बँकेला एखादे कर्ज किंवा अग्रिम राशी देण्यास सांगावे लागणार नाही.*

*२.२.६ ३) वरील २ प्रमाणे काही गंभीर प्रसंग उद्‌भवल्यास, त्या बँकेला बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम २०चे उल्लंघन करणारा एक पक्ष असे समजण्यात येईल.*

***२.२.७ भारत सरकारसाठी बँक हमी योजना***

*२.२.७.१) कंत्राटदारांकडून सुरक्षा ठेवी इत्यादींच्या ऐवजी केंद्र सरकारच्या विभागांना बँक हमी देण्याबाबतची भारत सरकारने तयार केलेली बँक हमी योजना वेळोवेळी सुधारित केली गेलेली आहे. ह्या योजनेखाली, सरकारी विभाग, कर्ज अनुसूचित वाणिज्य बँकांकडून मुक्तपणे हमी इत्यादी स्वीकारु शकतात.*

*२.२.७.२) बँकांबा **जोडपत्र १** मध्ये दिलेला बँक गॅरंटी बाँडचा आदर्श नमुना अंगिकारावा. भारत सरकारने सर्व सरकारी विभाग/ सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम ह्यांना सांगितले आहे की त्यांनी आदर्श नमुन्यातील बाँडचा स्वीकार करावा आणि खात्री करुन घ्यावी की आवश्यक असलेले खंड/ कलम ह्यामधील बदल/ भर ही एका बाजूकडीलच नसून हमीदात्या बँकेनुसारच आहेत. बँकांनी त्यांच्या हमी बंधपत्रात आणि त्यांच्या निरनिराळ्या राज्य सरकारांबरोबर केलेल्या पत्रव्यवहारात लाभार्थी विभाग आणि त्या हमीच्या हेतुचा उद्देश ह्यांचा उल्लेख करावा. संबंधित विभागांना त्या हमींची ओळख लगेच पटावी ह्यासाठी हे आवश्यक आहे. भारताच्या राष्ट्रपतींच्या नावे बँकांनी देलेल्या हमींबाबत त्यासंबंधीचा कोणताही पत्रव्यवहार हा संबंधित मंत्रालय/विभाग ह्यांच्याशीच केला जावा. भारताच्या राष्ट्रपतींशी नव्हे. डायरेक्टर जनरल ऑफ सप्लाइज अँड डिसपोजल ह्यांच्या नावे दिलेल्या हमीसंबंधाने पुढील गोष्टी विचारात घेतल्यात जाव्यात.*

*१) बँक हमीचा खरेपणा पडताळून पाहण्याची प्रक्रिया जलद व्हावी ह्यासाठी, त्या हमीवर असलेल्या अधिकाऱ्यांच्या सहीखाली, त्या अधिकाऱ्याचे/अधिकाऱ्यांचे नाव, हुद्दा, व संकेत क्रमांक दिले जावेत.*

*२) त्या बँक हमीच्या लाभार्थीला सांगण्यात यावे की त्याने एक सुरक्षा उपाय म्हणून, न चुकता, त्या बँकांनी दिलेल्या हमीं खऱ्या असल्याबाबतचा दुजोरा त्या बँकांकडून मिळवावा.*

*३) डायरेक्टरेट जनरल ऑफ सप्लाईज ॲड डिसपोजल कॉंट्रॅक्ट ॲडमिनिस्ट्रेशन मध्ये एक सिक्युरिटीचे साधन म्हणून बँकांनी दिलेल्या हमींचा सुरुवातीचा कालावधी (इनिशियल पिरियड) हा, मूळ डिलिव्हरी पिरियड पलिकडे सहा महिने एवढा असावा. बँका त्यांच्या बँक गॅरंटीच्या मजकुरात, वैधताकाल सहा महिन्यांनी आपोआप वाढला जाण्याबाबत एक खंड घालू शकतात आणि नंतरच्या समस्या टाळण्यासाठी, हमी सिध्द करतेवेळी ग्राहकाकडून योग्य असे प्रतिज्ञापत्र घेऊ शकतात.*

*४) डायरेक्टर जनरल ऑफ सप्लाइज अँड डिसपोजल (डीजीएस अँड डी), त्यांच्या निविदा फॉर्म २२९ मध्ये ( निविदाकाड़ांना सूचना) एक खंड टाकू शकतात की जेथे बँक हमी मिळाली असून एखादी संस्था कंत्राटानुसार ठरलेल्या कालावधीत माल देण्यास अपयशी ठरेल तेव्हा पुरवठयाच्या विस्तारित कालासाठी केलेली विनंती ही, ती बँक गॅरंटी विस्तारित करण्यासाठी केलेला करार असल्याचे आपोआपच समजले जाईल. असा हमी-कालावधी आपोआप विस्तारित केला जाण्याबाबतची तरतुद बँकांनी त्यांच्या बँक गॅरंटीमध्ये करावी.*

*५) सीमाशुल्क विभागाने दिलेल्या सार्वजनिक नोटिसीमध्ये इतर बाबींसह हे ही देण्यात आले आहे की, एखाद्या आयातदाराने दिलेल्या सर्व बँक हमींमध्येच एक स्वयं-नूतनीकरण खंडही समाविष्ट असावा. डीजीएस अँड डीने प्रसृत केलेल्या टेंडर फॉर्ममधील नोटीस ही, सीमाशुल्क विभागाने सार्वजनिक नोटीसीमधील अटीनुसारच असल्याने, डीजीएस अँड डी ह्यांना दिलेल्या बँकहमीमधील हमीकालाचा आपोआपच होणाऱ्या विस्ताराबाबतची तरतुद (वरील उपपरिच्छेद ४ प्रमाणे) ही सीमाशुल्क गृहांना दिलेल्या बँक हमींनाही लागु करण्यात यावी.*

६) प्रतिभूतीचे एक साधन म्हणून, डीजीएस अँड डी कॉंट्रॅक्ट ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये दिलेली बँकहमी व त्याबाबतच्या विस्ताराची पत्रे ही अ - न्यायिक स्टँप पेपरवर देण्यात यावी.

२.२.८ शेअर व स्टॉक ब्रोकर्स/ कमोडिटी ब्रोकर्स ह्यांच्या वतीने द्यावयाच्या हमी

सिक्युरिटी डिपॉझिटच्या ऐवजी, बँका, शेअर व स्टॉकब्रोकर्सच्या वतीने स्टॉक एक्सचेंजेच्या नावे हमी देऊ शकतात - मात्र अशा हमी स्टॉक एक्सचेंजेसने ठरविलेल्या स्वरुपात स्वीकार्य असल्या पाहिजेत. स्टॉक एक्सचेंजेसच्या विनियमांच्या आवश्यकतानुसार बँका मार्जिनच्या ऐवजी हमी देऊ शकतात. ह्याशिवाय बँकांना असेही सांगण्यात आले आहे की अशी हमी देतेवेळी त्यांनी किमान ५० टक्के मार्जिन मिळवावे. बँकांनी दिलेल्या अशा हमींसाठी किमान २५ टक्के रोख मार्जिन (वरील ५० टक्के मार्जिनमध्ये) ठेवले जावे. वरील किमान ५० टक्के मार्जिन आणि किमान २५ टक्के रोख मार्जिन (५० टक्कयांच्या मार्जिन मधील) हे बँकांनी कमोडिटी ब्रोकर्सच्या वतीने राष्ट्र स्तरावरील कमोडिटी एक्सचेंजेसना (उदा. नॅशनल कमोडिटी अँड डेरिवेटिव एक्सचेंज (एन सी डी एक्स) मल्टिकमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया लि.(एनसीएक्स) आणि नॅस्घनल मल्टी-कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया लि. (एनएमसीईआयएल) ह्यांनाही कमोडिटी एक्सचेंज विनियमांनुसार असलेल्या मार्जिन आवश्यकतांच्या बदल्यात बँकांनी दिलेल्या हमींना लागु आहे. बँकांनी प्रत्येक अर्जदार कर्जदाराचे मूल्यमापन करावे आणि जोखीम मर्यादेसह सर्व प्रकारच्या नेहेमीच्या व आवश्यक सावधानता बाळगाव्यात.

२.२.९ संचालकांची आणि कर्ज मागयाऱ्या संस्थांच्या व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांच्या वैय्यक्तिक हमी मिळविण्याबाबत मार्गदर्शक तत्वे.

२.२.९.१) संचालकांच्या वैय्यक्तिक हमी

एक नेहमीची रीत म्हणून नव्हे तर केवल आवश्यक असेल तेव्हाच आणि प्रकरणाची परोस्थितीची काळजीपूर्वक तपासणी करुनच बँकांनी, कॉर्पोरेट संस्थांना (सार्वजनिक किंवा खाजगी) देलेल्या कर्जसुविधासाठी संचालकांच्या वैय्यक्तिक हमी घ्याव्यात. हमी देणे आवश्यक आहे किंवा नाही ह्याबाबत परिस्थिती समजण्यासाठी बँकांनी पुढील स्थूल तत्वांचा विचार करावा.

अ) हमी देणे आवश्यक नसलेली परिस्थिती

१) सर्वसाधारणतः पब्लिक लिमिटेड कंपन्यांच्या बाबतीत, जेथे त्या कंपन्यांचे व्यवस्थापन, त्याचा त्या कंपन्यातील प्रभाव, त्या प्रस्तावाची आर्थिक सफलक्षमता आणि रोकड निर्माण करण्याबाबतीतची क्षमता व आर्थिक स्थिती ह्याबाबत धनको संस्थेचे समाधान झाले असल्यास कोणत्याही वैय्यक्तिक हमीसाठी आग्रह धरला जाऊ नये. खरे म्हणजे, बहु-मालकीच्या पब्लिक लिमिटेड कंपन्यां, ज्या प्रथम दर्जाच्या समजल्या जातात व वरील अटी पूर्ण करतात त्यांच्या बाबतीत दिलेल्या अग्रिम्राशी अप्रतिभूतित असल्या तरीही हमींची आवश्यकता असू नये. तसेच, कंपन्या खाजगी असोत की सार्वजनिक, त्या व्यावसायिक व्यवस्थापनाखाली असल्यास, त्या कंपन्यांमधील व्यक्तींकडून ज्या केवळ त्यांच्या व्यवसायिक/तांत्रिक अर्हतेमुळे व्यवस्थापनाशी जोडल्या गेल्या आहेत व संबंधित कंपनीमध्ये ज्यांचे विशेष भाग धारण नाही अशा व्यक्तींकडून- हमींसाठी आग्रह धरला जाऊ नये.

२) जेथे कर्जदारी संस्था वर निर्देश केलेल्या कर्ज प्रस्तावांबाबत समाधानी नसतील तेथे त्या संस्थांनी अशा हमींशिवाय हे प्रस्ताव स्वीकारले जाण्यासाठी अटी घालाव्यात. काही बाबतीत, लाभांश वाटपासाठी निर्बंध, भावी विस्तार, एकूण कर्जे, ॲसेट्सवर अधिक चार्ज निर्माण करणे, आणि किमान नक्त कार्यकारी भांडवल ठेवणे अशी कडक वित्तीय बंधने घालणे आवश्यक असतात. ह्याशिवाय निज-निधी व भांडवली गुंतवणुक ह्यामधील मेळ (पॅरिटी) आणि सर्वंकष डेट-इक्विटी गुणोत्तर हे देखील विचारात घ्यावे लागतील.

ब) हमी साह्यभूत वाटतील अशा बाबी

*१) खाजगी किंवा पब्लिक कंपन्या, जेथे शेअर्स हे एका व्यक्तीकडून किंवा संबंध असलेल्या व्यक्तींकडून किंवा एखाद्या गटाकडून (व्यवसायिक किंवा सरकारी नसलेला) शेअर्स क्लोजली धारण केलेले असतात तेथे इतर घटकांचा जसे आर्थिक स्थिती, उपल्बध सिक्युरिटी इत्यादि- विचार व करताही, संचालकांचा वैय्यक्तिक हमी साह्यभूत होऊ शकतात. ह्याला अपवाद म्हणजे, अशा कंपन्या की जेथे कोर्टाच्या किंवा वैज्ञानिक आदेशाने, त्या कंपनीचे व्यवस्थापन एक किंवा अनेक व्यक्तींकडे दिलेले असते व अशा व्यक्तींना संचालक किंवा अन्य नाव दिलेले असून त्यांना शेअर होल्डर्सद्वारा निवडण्याची आवश्यकता नसते. जेथे वैय्यक्तिक हमी आवश्यक समझली जाले तेथे ती हमी, त्या कर्जदार कंपनीमधील शेअर धारक गटाच्या सभासदांची असावी संचालक/संचालक म्हणून काम बघणाऱ्या व्यवस्थापकीय अधिकाऱ्याची किंवा व्यवस्थापकीय क्षमतेत काम करणाराची नसावी.*

*२) एखादी कंपनी 'क्लोजली हेल्ड' नसली तरीही, व्यवस्थापन पुढे जात राहील ह्यासाठी एखादी वैय्यक्तिक हमी देणे आवश्यक असू शकते. अशा प्रकारे, एखादी कर्जदायी कंपनी, जिथे व्यवस्थापन चांगले असल्याचे समजले जाते अशा कंपनीला कर्ज देऊ शकते. परिणामी, एखादा अन्य गट त्या कंपनीचा ताबा घेऊ शकतो व ह्यामुळे कर्जदायी कंपनीच्या मनात साहजिकच भीति निर्माण होऊ शकते की त्या कंपनीचे व्यवस्थापनात हानिकारक फरक झाला असून त्या कंपनीला दिलेला निधी धोक्यात आला आहे. अशा परिस्थितित कर्जदायी संस्थेला स्वतःचे संरक्षण करण्याचा उपाय म्हणजे संचालकांच्या हमी मिळवून तेच व्यवस्थापन पुढे जात राहील किंवा त्यातील बदलांची त्यांना माहिती मिळत राहील ह्याची खात्री करुन घेणे. जेथे वैय्यक्तिक हमी फेटाळल्या जातात तेथे, कर्जदायी संस्थेच्या अनुमतीशिवाय व्यवस्थापनात कोणताही बदल केला जाणार नाही असे प्रतिज्ञापत्र कर्जदार कंपनीकडून घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, एखाद्या कंपनीच्या सुरुवातीच्या काळात तेच व्यवस्थापन पुढे सुरु राहील ह्याची खात्री करण्यासाठी, कर्जदायी संस्था व कर्जदार संस्था ह्यांच्या हिताच्या दृष्टीने हमी घेणे हिताचे ठरेल.*

*३) जेथे अग्रिम राशी ही अप्रतिभूतित धर्तीवर दिलेली आहे अशा व प्रथम दर्जाच्या सोडून असलेल्या पब्लिक लिमिटेड कंपन्यांच्या बाबतीत संचालकांच्या वैय्यक्तिक हमी साह्यभूत ठरु शकतात.*

*४) संबंधित अग्रिमराशी प्रतिभूतित असल्या तरीही ज्यांची रोकड निर्मिती क्षमता आणि/किंवा परिस्थिती सावधानकारक नाही अशाही पब्लिक लिमिटेड कंपन्या असू शकतात. अशा बाबतीत वैय्यक्तिक हमी उपयुक्त असतात.*

*५) ॲसेट्सवरील चार्ज निर्माण होण्यास बराच कालावधी लागण्याचा संभव आहे तेथे, कर्जवाटप आणि ॲसेटवर चार्ज निर्माण होण्या दरम्यानच्या कालावधीसाठी, आवश्यक वाटल्यास हमी घेतली जावी.*

*६) ज्याची स्वतःची आर्थिक परिस्थिती नीट नाही अशा दुय्यम/सहाय्यक संस्थांच्या बाबतीत त्यांच्या मुख्य/मूळ संस्थांकडून हमी घेतली जावी.*

*७) एखाद्या कंपनीच्या ताळेबंदानुसार किंवा वित्तीय विवरणपत्रानुसार, ती कंपनी आणि एखाद्या गटच्या मालकीच्या किंवा व्यवस्थापनाखाली असलेल्या कंपन्यांमध्ये निधी गुंतल्याचे आढळून आल्यास वैय्यक्तिक हमी योग्य ठरतात.*

*क) हमीदारांची अर्हता हमीच्या कमिशनचे प्रदान इत्यादि*

*जेथे संचालकांच्या वैय्यक्तिक हमी दिल्या जातात तेथे त्या व्यक्तीच्या काढलेल्या अर्हतेचे वाजवी मूल्यांकन केले जावे. हमी मिळविण्याची प्रणाली ही संचालक व इतर व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांनी त्या कंपनीकडून मिळविण्याचा उत्पन्नाचा स्त्रोत करु नये. बँकांनी, कर्जदार कंपनीकडून तसेच हमीदाराकडूनही प्रतिज्ञापत्र घ्यावे की कर्जदार, हमीदाराला कमिशन किंवा दलाली किंवा अन्य स्वरुपाचे काही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे देणार नाही. कर्जमर्यादा मंजुर करतेवेळी बँकेच्या अटी व शर्तीमध्ये ही अट घातली जावी. नियतकालिक तपासणी करतेवेळी, बँकेच्या तपासनीसांनी ही अट पाळली गेली आहे काय हे पडताळून पहावे. तथापि अशी काही प्रकरणे असतील की जेथे मोबादला देणे आवश्यक आहे. उदा. जेथे मदत दिलेल्या संस्थांचे नीट चाललेले नाही व विद्यमान हमीदारांचा व्यवस्थापनशी काहीही संबंध राहिला नाही, परंतु त्यांच्या हमी पुढे*

*सुरु रहाव्यात हे आवश्यक आहे कारण, नवीन व्यवस्थापनाची हमी उपलब्ध नाही किंवा अयोग्य वाटत असल्याने, हमीदारांना हमीच्या कमिशनच्या रुपाने मोबदला देण्याची परवानगी दिली गेली आहे.*

*ड) आजारी एककांच्या बाबतीत वैय्यक्तिक हमी*

*प्रायोजक/ संचालक ह्यांच्या वैय्यक्तिक हमींमुळे त्यांच्यावर अधिकतर दायित्वे व जवाबदाऱ्या पडत असल्याने, मदत केलेली एकके नीटनेटकी व सुदृढपणे चालावीत ह्यासाठी व्यवस्थापनांवर जोर दिला जाण्यासाठी व वित्तीय शिस्त ठेवण्यासाठी, बँका, त्यांना तसे वाटल्यास, संचालकांकडून (नामनिर्देशित संचालक सोडून) आणि इतर व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांकडून त्यांच्या वैय्यक्तिक अधिकारात हमी घेऊ शकतात. जर काही कारणासाठी, अग्रिम राशी मंजुर करतेवेळी बँकेला तसे करणे उपयुक्त नसल्याचे वाटल्यास, प्रत्येक संचालकाकडून एक-एक प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे आणि कर्ज करारनाम्यात करार घालण्यात यावा की, जर ते कर्जदार एकक रोकड हानि किंवा ऍडव्हर्स करंट रेशो किंवा निधी वळविला जाणे दाखवत असेल तर, बँकेने तसे ठरविल्यास, संचालकांवर वैय्यक्तिक क्षमतेत त्या हमी कार्यान्वित (एक्झिक्युट) करण्याचे दायित्व असेल. त्याच गटातील कर्जदार एककांना कर्ज सुविधा दिल्या गेल्यास, बँका, त्यांना तसे वाटल्यास मुख्य/मूळ/धारक कंपनीकडून हमी घेऊ शकतात.*

*२.२.१० <u>राज्य सरकारच्या हमी</u>*

*वरील परिच्छेद २.२.९ मधील, संचालक व अन्य व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांच्या वैय्यक्तिक हमी घेण्याबाबत असलेली मार्गदर्शक तत्वे, राज्य सरकार्चे उपक्रम/प्रकल्प ह्यांच्या प्रस्तावांच्या बाबतीतही लागु करण्यात यावी. आणि अत्यंत आवश्यक असल्याशिवाय हमीचा आग्रह धरला जाऊ नये. दुसऱ्या शब्दात, बँका, राज्य सरकारच्या हमी, केवळ गुणविशेषांवर आणि प्रत्येक प्रकरणाची व परिस्थितीची संपूर्ण चौकशी-तपासणी करुनच घेऊ शकतात. ऩेहमीचीच एक रीत म्हणून नव्हे.*

## *२.३ <u>विदेशी मुद्रा व्यवस्थापन (हमी) विनियमांखाली दिलेल्या विनियमांनी नियंत्रित हमी</u>*

*२.३.१ बिड बाँड्स आणि परफॉर्मन्स बाँड्स किंवा निर्यातीसाठी हमी*

*१) अधिसूचना क्र. फेमा. ८/२००० - आरबी दि. मे, ३, २००० च्या तरतुदीनुसार भारतामधून केलेल्या विश्वसनीय निर्यातींसाठी, विदेशी खरेदीदारांच्या नावे परफॉर्मन्स बाँड किंवा हमी देण्याची प्राधिकृत डीलर बँकांना देण्यात आली आहे.*

*२) ताकीद दिलेल्या (कॉशन लिस्टेड) निर्यातदारांच्या बाबत परफॉर्मन्स बाँड/हमी देण्यासाठी प्राधिकृत डीलर बँकांनी आरबीआयची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. अशा हमी देण्यापूर्वी, अर्जदाराच्या विश्वसनीयतेबाबत व आणि ते कंत्राट पूर्व करण्याच्या त्याच्या क्षमतेबाबत, आणि त्या कंत्राट/हमी ह्याचे मूल्य हे, त्या कंत्राट/निविदेची एक टक्केवारी ह्या रुपाने वाजवी असून, आंतरराष्ट्रीय व्यापारामधील सर्वसाधारण पध्दतीनुसार असल्याबाबत आणि त्या कंत्राटाच्या अटी व शर्ती ह्या विदेशीमुद्रा व्यवस्थापन विनियमांनुसार आहेत ह्याबाबत त्या बँकेचे समाधान झाले असले पाहिजे.*

*३) वर सांगितल्यानुसार बाब असल्यास, स्थानिक कायदे/विनियमानुसार जेथे विदेशी खरेदीदारांना केवळ तेथील निवासी बँकांच्याच हमी स्वीकार्य आहेत, अशा बाबतीत, भारतीय निर्यातदारांच्या वतीने प्राधिकृत डीलर बँकांच्या विदेशातील शाखांनी/सहप्रतिवादींनी द्यावयाच्या हमींसाठी, प्राधिकृत डीलर बँका, शाखा/सहप्रतिवादींच्या नावे प्रति-हमी (काउंटर गॅरंटीज्) देऊ शकतात.*

*४) तो बाँड/ती हमी जेव्हा आवाहित केली जाईल व केल्यास प्राधिकृत डीलर बँक, त्याखाली द्यावयाचे प्रदान अनिवासी लाभार्थींना करेल.*

२.३.२ <u>बँक गॅरंटी देणे.</u>

*आधिसूचना क्र. फेमा. ८/२००० - आरबी दि. मे, ३, २००० द्वारा अधिसूचित व विदेशी मुद्रा व्यवस्थापन (हमी) विनियम, २०००च्या विनियम ४ अन्वये त्यामध्ये दिलेल्या विशिष्ट बाबींसाठी एडीबँकांना हमी देण्याची परवानगी आहे.*

*१) विदेशी विमान कंपन्या/आयएटीए ह्यांच्या नावे बँक हमी देणे*
*इंटरनॅशनल एअर ट्रान्सपोर्ट असोशिएशन (आयएटीए) चे सभासद असलेल्या विदेशी विमान कंपन्यांच्या भारतीय एजंटांना, त्यांच्या तिकिटे देण्याच्या व्यवसायाबाबत, विदेशी विमान कंपन्या/आयएटीए ह्यांच्या नावे बँक हमी देणे आवश्यक आहे ह्या व्यवसायात ही एक सर्व सामान्य आवश्यकता असल्याने, एडी बँका, व्यवसायाचा एक सर्वसामान्य भाग म्हणून, आयएटीएचे सभासद असलेल्या, विदेशी विमान कंपन्यांच्या भारतीय एजंटांना त्यांच्या तिकिटे देण्याच्या व्यवसायाबाबत, विदेशी विमान कंपन्या/आयएटीएच्या नावे हमी देऊ शकतात.*

ii. *सेवा निर्यातकांच्या वतीने बँक हमीचे वितरण*

*सेवांच्या निर्यातीसाठीच्या प्रक्रिया पुढे उदार बनविण्याच्या दृष्टिकोनातुन ( सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी किंवा भारत शासनाच्या/राज्य शासनाच्याविभागाच्या /उपक्रमाच्या संदर्भापेक्षा वेगळ्या असलेल्या), असा निर्णय घेण्यात आला आहे की,एडीश्रेणी १बँकांचे क्रेडिट १००००० यु एस डी वरुन ५००००० युएस डी पर्यंत वाढविण्यात आले आहे. ए डी श्रेणी १ च्या बँकांना ५००००० यु एस डीच्या आतील रकमेची किंवा सेवा निर्यातक असलेल्या रहिवासी अशिलाच्या वतीने अनिवासी सेवा देणाऱ्या एवढी हमी वितरीत करण्याची मंजूरी देण्यात आली आहे यासाठीच्या अटी खालील प्रमाणे आहेतः*

A. *ए डी श्रेणी १ बँक व्यवहाराच्या वास्तविकतेसंबंधी समाधानी असावी.*
B. *सर्वसामान्य स्थितीमध्ये सेवांच्या निर्यातीसाठी दस्तऐवज पुराव्याच्या प्रस्तुतीला ए डी श्रेणी१ च्या बँकेने शाश्वत करावे.*
C. *रहिवासी आणि अनिवासी यांच्यातील करारामधुन निर्माण झालेल्या थेट करारात्मक देय्याला सुरक्षित करण्याची हमी दिली जाईल.*

*सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी किंवा सेवांच्या निर्यातीसाठीच्या प्रक्रिया पुढे उदार बनविण्याच्या दृष्टिकोनातुन ( सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी किंवा भारत शासनाच्या/राज्य शासनाच्याविभागाच्या /उपक्रमाच्या स्थितीत,भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाकडुन १००००० युएसडीपेक्षा (यु एस डी एक लाख) जास्त असलेल्या/तेवढ्याच किमतीच्या रकमेसाठी हमीच्या वितरणा करीता मंजूरी मिळणे गरजेचे आहे.*

*३) कमोडिटी हेजिंगसाठी बँक हमी देणे.*
*भारतामधील एडी वर्ग - १ बँक, भारतामधील रहिवाशी व्यक्तीने निर्माण केलेल्या, व अशा निवासी व्यक्तीने केलेल्या अनुमतीप्राप्त कमोडिटी हेजिंग व्यवहाराबाबत, भारताबाहेर राहणाऱ्या व्यक्तीला देय असलेल्या मार्जिन मनीच्या दायित्वासाठी रिझर्व बँकेने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्तींनुसार हमी किंवा पाठिंबा देणारे (स्टँडबाय) पतपत्र देऊ शकते. एडी वर्ग - १ बँकाद्वारे ह्या सुविधेखाली द्यावयाच्या हमी/स्टँडबाय पतपत्राच्या आधारभूत अटी व शर्तींसाठी, जुलै १, २००९ चे "रिस्क मॅनेजमेंट अँड इंटर बँक डीलिंग्ज" वरील महा परिपत्रकाचा संदर्भ घ्यावा.*

*४) हमी आवाहित करणे (इनव्होकेशन)*

*हमी आवाहित करण्याबाबत, एडी बँकेने, मुख्य प्रभारी व्यवस्थापक, विदेशी मुद्रा विभाग, बाह्य प्रदान विभाग (ईपीडी), भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय मुंबई -४००००१ ह्यांना, ही हमी कोणत्या परिस्थिती आवाहित केली ह्याचा सविस्तार अहवाल पाठवावा.*

*२.३.३ इतर अटी*

*१) निर्यात वाढविण्यसाठी, निर्यातीच्या उद्देशासाठी बिड बाँड्स व परफॉर्मन्स हमी देतेवेळी प्रतिभूती (कव्हर) मिळविणे आणि अॅसेट्स/कर्ज मर्यादा, निकासी शक्ति इत्यादि ठरविण्यासाठी लवचिक दृष्टिकोन ठेवावा. जेथे आवश्यक वाटले तेथे बँका ईसीजीसीची एक्सपोर्ट परफॉर्मन्स हमी मिळवून स्वतःचे हित जपू शकतात.*

*२) बँकानी रोख मार्जिनचा आग्रह न धरल्यास, एक्सपोर्ट क्रेडिट अँड गॅरंटी कॉर्पोरेशन (ईसीजीसी) बिड बाँड्ससाठी ९० टक्के कव्हर उपलब्ध करुन देतील.*

*३) ह्यासाठी, ईसीजीसीने प्रति-हमी दिल्यास बँकांनी बिड बाँड्स व हमींच्या बाबतीत कोणतेही रोख मार्जिन मागू नये.*

*४) जेथे ईसीजीसीच्या प्रति हमी कोणत्याही कारणाने उपलब्ध नाहीत अशा इतर प्रकरणांमध्ये, जेथे अत्यंत आवश्यक आहे तेथे, बँका वाजवी अशा रोख मार्जिनची अट घालू शकतात, कारण असे बीड बाँड्स/हमी देतेवेळी त्यांनी निर्यातदारांची आर्थिक स्थिती व क्षमता ह्याबाबत स्वतःचे समाधान करुन घेतलेले असते.*

*५) बीड बाँड्स देण्यासाठी वेगवेगळ्या मर्यादा मंजुर करण्याचा विचार बँका करु शकतात. अशा मंजुर केलेल्या मर्यादामध्ये, नेहमीच्या अटीनुसार वैय्यक्तिक/प्रत्येक कंत्राटा विरुध्द बिड बाँड्स देता येतील.*

*२.३.४ भारतीय निर्यातदारांच्या वतीने विदेशी मालकांना (एंप्लॉयर्स)/आयाटदारांना विनाअट हमी*

*१) भारतीय निर्यातदारांच्या वतीने विदेशी मालकांना/आयातदारांना विनाअट हमी देतांना बँकांनी त्या निर्यातदाराकडून प्रतिज्ञापत्र घ्यावे की, हमी आवाहित केली जाईल तेव्हा निर्यातदार व आयातदारांच्या दरम्यान कोणताही दावा असला तरी बँकेला प्रदान करावेच लागेल. अशा प्रकारच्या प्रतिज्ञापत्रामुळे निर्यातदाराला मनाई आदेश आणव्यासाठी कोर्टमध्ये जाण्यास कोणीही रोखू शकत नसले तरी, मनाई आदेश देण्याबाबत ह्यामुळे कोर्टावर वजन पडेल.*

*२) भावी काळात हमी देतेवेळी बँकांनी वरील मुद्दे लक्षात घ्यावेत आणि त्यांच्या कायदेशीर सल्लागाराच्या सल्लयाने करारनाम्यात योग्य ती कलमे घालावीत आवश्यक आहे कारण आवाहित केल्यावर हमींचा मान न राखला गेल्यास विदेशी बँका, भारतीय बँकांच्या हमी न स्वीकारण्याचे ठरवू शकतात व त्यामुळे देशाच्या निर्यात विकासाला खीळ बसू शकते.*

*२.३.५ प्रकल्प निर्यातीच्या बाबतीत काही दक्षता*

*१) बँकांना माहितच आहे की, विदेशातील उच्च मुल्याच्या प्रकल्पांसाठी, बिड नंतरच्या टप्प्यांवर, पॅकेज मंजुरीसाठी, कार्यकारी गटाची यंत्रणा विकसित करण्यात आली आहे. कार्यकारी गटाची भूमिका मुख्यतः विनियामक स्वरुपाची आहे परंतु प्रकल्पाचे मुल्यमापन व त्यावरील द्खरेख ह्याची जबाबदारी केवळ प्रायोजक बँकवेरच आहे.*

*२) कार्यकारी गटाने देलेल्या मंजुरी ह्या प्रायोजक बँकांच्या शिफारशींवरच आधारित असल्याने त्या प्रायोजक बँकांनी, कंत्राटदार/उपकंत्राटदार त्यांच्या क्षमता, कंत्राटामधील संरक्षणात्मक कलमे, प्रतिभूतीची योग्यता/वाजवीपणा, विदेशी उपकंत्राटदारांची पत इत्यादींच्या बाबत प्रकल्पांचा प्रस्ताव नीट तपासून पहावा.*

३) ह्यामुळे अशा प्रस्तावांमधील आर्थिक व तांत्रिक मागण्या आणि कंत्राटदारांची (उपकंत्राटदारांसह) व विदेशातील मालक ह्यांचे काळजीपूर्वक केलेले मूल्यमापन अशा देशांतर्गत प्रकल्पांना निधी पुरवठापुढे कमी लेखले जावू नये. खरे म्हणजे, त्यांच्या उच्च मूल्यामुळे व अपयश आल्यास होणाऱ्या विनियमाच्या हानीमुळे व भारतीय व्यावसायिकांची प्रतिमा डागळण्याच्या शक्यतेमुळे, विदेशातील प्रकल्पांकडे अधिकतर लक्ष देले गेले पाहिजे.

४) बिड बॉंड्स व परफॉर्मन्स हमी टाळता येण्यासारख्या नसल्या तरी, विदेशातील प्रकल्पांना कर्ज देण्याच्या सर्व प्रकरणांमध्ये बँकांनी हमी द्याव्यात काय ह्याचा विचार केला जावा. अशा हमी देणे एक रीत म्हणून केवळ एक्झिम बँकेचा सहभाग आहे व आणि ईसीजीसी बँकेची प्रतिहमी मिळते म्हणून दिल्या जाऊ नयेत. त्या दिल्या गेल्यानंतर करावयाचा पाठपुरावा व कंत्राटावर देखरेख ठेवणे ह्यासाठीही सुयोग्य व्यवस्था केल्या गेल्या पाहिजेत.

२.३.६ <u>निर्यातीसाठी अग्रिम राशीबाबत हमी</u>

१) रिझर्व बँकेच्या असे नजरेस आले होते की, कमी निर्यात उलाढाल असलेल्या निर्यातदारांना, देशांतर्गत बँक हमीच्या विरुध्द, कमी व्याज असलेल्या चलनांमध्ये, निर्यात अग्रिमराशी म्हणून मोठ्या रकमा दिल्या जात आहेत, आणि ते अशा अग्रिमराशी, बँकेमध्ये भारतीय रुपयांच्या स्वरुपात व्याजदरांचा व्यापार (आर्बिटेज) करण्यासाठी ठेवतात. ह्याशिवाय, अग्रिमराशी मिळण्याच्या आधीच हमी दिल्या जातात. मात्र तरीही त्यात अशी तरतूद असते की ह्या हमी, अग्रिमराशी मिळाल्यानंतरच कार्यक्षम होईल. अशा हमी दर्शनी मूल्यांवर व निर्यात अग्रिमराशींच्या डिसकाऊंटेड मूल्यांवर दिल्या जातात. फेमा विनियमांचे उल्लंघन होत असूनही, प्रत्यक्षात निर्यात न झाली तरीही आणि/किंवा पूर्व कामगिरी नसली तरीही निर्यातदारांना मिक्तपणे पुढील कंत्राटांचे बुकिंग, रद्दीकरण व पुनर् आरक्षण (रिबुकिंग) करण्याची परवानगी( दिली जाते. असेही दिसून आले आहे की, निर्यातदार त्यांच्या चलन जोखमीमधील भारतीय रुपये - युएस डॉलर्सचा बराचसा भाग खुला ठेवतात व त्यामुळे निर्यातदार व देशांतर्गत बँक ह्या दोघांनाही विदेशी मुद्रा जोखमीला समोरे जावे लागते. अशा बाबतीत, सर्वसाधारणतः कोणतीही निर्यात झालेली नसते आणि अशा निर्यातदारांजवळ मोठ्या निर्यात ऑर्डर्स पुरविण्याबाबतची क्षमता आणि पूर्वेतिहासही नसतो असे व्यवहार मूलतः व्याजदरातील फरक व चलन फिरविण्यासाठीच केले जातात व त्यामुळे भांडवली वहनावर (कॅपिटल फ्लो) परिणाम होतो.

२) एखाद्या निर्यातदाराच्या भारतामधून केलेल्या निर्यातीमुळे निर्माण झालेल्या जबाबदारीसाठी किंवा कर्जाबाबत हमी देण्यास परवानगी आहे. ह्यासाठी निर्यातदाराने निर्यातीची कंत्राटे पूर्ण करावीत म्हणून हमी दिल्या जावात - अन्य हेतूंसाठी नव्हे, हा हमींचा उद्देश आहे. विद्यमान सूचनांच्या अनुसार, बँकांना सांगण्यात आले आहे की, हमींमध्ये अंगभूत जोखमी असतात आणि त्यामुळे पक्षांनी त्यांची दायित्वे अधिक ताणून, हमी सहजतेने मिळू शकतात म्हणून अन्य उद्योग करण्यास प्रोत्साहन देणे हे बँकेच्या तसेच जनतेच्या हिताच्या दृष्टीनेही योग्य नाही. ह्यासाठी पुनश्च सांगण्यात येत आहे की, हमींमध्ये अंगभूत जोखमी असल्याकारणाने, वरील परिच्छेद २.३.६.(१) मध्ये दिलेले व्यवहार बँकांनी करणे हे बँकांच्या तसेच आर्थिक प्रणालीच्या हिताच्या दृष्टीने योग्य ठरणार नाही. निर्यात अग्रिमराशींच्या विरुध्द हमी देतांना बँकांनी फेमा विनियमांचे उल्लंघन होणार नाही व बँकांना निरनिराळ्या धोक्यांना सामोरे जावे लागणार नाही ह्याची त्यांनी काळजी घ्यावी. बँकांसाठी हे महत्वाचे असेल की त्यांनी योग्यती सावधानता घेऊन, अशा निर्यात - ऑर्डर्स पूर्ण करण्याबाबत अशा निर्यातदारांची क्षमता व पूर्ण कामगिरी पडताळून पहावी.

३) बँकांनी ह्याचीही खात्री करुन घ्यावी की, निर्यातदारांना मिळालेली निर्यात अग्रिम्राशी ही विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ खाली दिलेले विनियम/निदेश ह्यांना धरुन आहे.

२.३.७ <u>बँकेच्या कार्य प्रणालींचे पुनरावलोकन</u>

बँकांनी त्यांना दिलेले अधिकार व त्यांच्या कार्यप्रणाली ह्यांचे नियतकालिक पुनरावलोकन करावे आणि निर्यात प्रस्तावांवरील निर्णय लवकर घेतले जाण्यासाठी आवश्यक ती कारवाई करावी. केंद्रामधील सर्व निर्यात कर्ज प्रस्ताव हाताळण्यासाठी, प्रत्येक महत्वाच्या केंद्रात योग्य अर्हता असलेला व प्रशिक्षित असा कर्मचारीवर्ग असलेली एक विशिष्ट शाखा ठेवण्याचा विचारही बँका करु शकतात.

२.३.८ *विदेशी मुद्रा व्यवस्थापन नियमांद्वारे नियंत्रण इतर हमी*

*पुढील प्रकारच्या हमी देणे विदेशी मुद्रा व्यवस्थापन नियमांद्वारे नियंत्रित करण्यात आले आहेः-*

*१) छोट्या हमी*

*२) बँक हमी - विदेशी कर्जे/क्रेडिट्सखाली आयात*

*३) अनिवासी व्यक्तींसाठी हमी.*

*कार्यकारी सूचनांसाठी, वर दिलेल्या फेमा ८/२००० दि. मे ३, २००० खाली दिलेल्या अधिसूचनेचा, तसेच विदेशी मुद्रा व्यवस्थापनाने दिलेल्या त्यांच्या मार्गदर्शक तत्वांचा संदर्भ घ्यावा. तथापि सुलभ संदर्भासाठी, ह्या हमी देण्याबाबतच्या सूचना/ मार्गदर्शक तत्वे खाली देण्यात आली आहेत.*

*२.३.८.(१)* ***छोट्या हमी***

*प्राधिकृत डीलर्स, त्यांचे ग्राहक आणि विदेशातील शाखा व प्रतिवादी संस्था ह्यांच्या वतीने, व्यवहाराचा एक सर्वसाधारण भाग म्हणून, हरविलेली किंवा दोषयुक्त कागदपत्रे, सह्यांची सत्यता तत्सम करणांसाठी हमी देऊ शकतात.*

*२.३.८.(२) बँक हमी - निदेश कर्जे/ क्रेडिट्स खाली आयात*

*एक्सर्नल कमर्शियल बॉरोईंग(ईसीबी) संबंधात, विदेशातील धनकोंच्या नावे, बँकांना, हमी/स्टँडबाय/पतपत्रे/किंवा लेटर्स ऑफ कंफर्ट देण्यास परवानगी नाही. एसएमईच्या बाबतीत, ईसीबी संबंधात, बँकांद्वारे, हमी/स्टँडबाय पतपत्रे/किंवा लेटर्स ऑफ कंफर्ट देण्याबाबतच्या अर्जांचा विचार, रिझर्व बँकेकडून, मंजुरीप्राप्त मार्गाखाली गुणांनुसार व प्रुडन्शियल नॉर्म्सनुसार केला जाईल. वस्त्र उद्योगातील कंपन्यांद्वारे, त्यांच्या उद्योग-एककांच्या आधुनिकीकरणासाठी किंवा विस्तारासाठी, व मल्टि फायबर करारनाम्यांचे फेजिंग आउट केल्यानंतर, बँकांद्वारे हमी, स्टँडबाय पतपत्रे, लेटर्स ऑफ अंडरटेकिंग्किंवा लेटर्स ऑफ कंफर्ट देण्यासाठी केलेले अर्ज, रिझर्व बँकेकडून, मंजुरीप्राप्त मार्गाखाली, प्रुडेन्शियल नॉर्म्सनुसार विचार घेतले जातील.*

*२.३.८.(३) भारतात आयात करण्यासाठी ट्रेड क्रेडिट्स*
*हमी देणे - अधिकार देणे*

*१) विदेशी पुरवठादार, बँक व वित्तसंस्था ह्यांनी, तीन वर्षांपेक्षा कमी परिपक्वता काळासाठी देलेल्या थेट क्रेडिटला ह्यापुढे आयातीसाठी "ट्रेड क्रेडिट" असे संबोधण्यात आले आहे. वित्ताच्या स्त्रोतावर अवलंबून अशा ट्रेड क्रेडिटमध्ये सप्लायर्स (पुरवठेदाराचे) क्रेडिट आणि बायर्स (खरेदीदाराचे) क्रेडिट समाविष्ट असतील. येथे नोंद घ्यावी की, तीन वर्षे व त्यापेक्षा अधिक कालासाठी असलेले बायर्स व सप्लायर्स क्रेडिट हे एक्सटर्नल कमर्शियल बॉरोईंग्ज (ईसीबी) च्या वर्गामध्ये येत असून आणि त्यावर एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ६० दि. जानेवारी ३१, २००४ द्वारे दिल्या गेलेल्या व वेळोवेळी सुधारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे नियंत्रण आहे.*

*२) एडी बँका, भारतात आयात करण्यासाठी, युएसडी २० दशलक्ष पर्यंतचे प्रतिआयात व्यवहार ट्रेड क्रेडिट डीजीएफटीच्या विद्यमान विदेशी व्यापार धोरणाखाली परवानगी असलेल्या आयातीसाठी व माल पाठविल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या परिपक्वता काळासाठी मंजुर करु शकतात. डीजीएफटीने वर्गीकृत केलेल्या भांडवली मालाच्या आयातीसाठी, एडी बँका, प्रति आयात व्यवहारासाठी युएसडी २० दशलक्ष एवढे ट्रेड क्रेडिट, एक वर्षापेक्षा अधिक व तीन वर्षापेक्षा कमी परिपक्वता काळासाठी मंजुर करु शकतात. ह्या परवानगीप्राप्त कालापलिकडे कोणतेही रोल ओव्हर/विस्तार देण्यास परवानगी नाही.*

*३) प्राधिकृत डीलर बँकांना, हमी/लेटर ऑफ अंडरटेकिंग(एलओयु)/लेटर ऑफ कंफ्रट (एल ओ सी) विदेशी पुरवठेदार बँक व वित्तसंस्थांच्या नावे, प्रति आयात व्यवहार युएसडी २० दशलक्ष, विदेशी व्यापार धोरणाखाली*

*परवानगीप्राप्त सर्व अभांडवली माल (सोने सोडून) एक वर्षासाठी आयात करण्या सर्वसाधारण परवानगी आहे. तर भांडवली माल आयात करण्यास तीन वर्षासाठी परवानगी आहे. मात्र ह्यासाठी रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेल्या प्रुडेन्शियल नॉर्म्सचे पालन केले असले पाहिजे. अशा हमी/एल ओ यु/एलओसी ह्यांचा काल, माल पाठविल्याच्या तारखेपासून गणना केलेल्या क्रेडिट काळाशी जुळला पाहिजे.*

*४) अहवाल पाठविण्याच्या व्यवस्थेबाबत, एडी बँकांना हमी/एलओयु/एलओसी ह्यांच्या विम्यासंबंधीची सर्व शाखांचीमाहिती एकत्रित करुन, दर तीन महिन्यांनी (नमुना जोडपत्र २ मध्ये), प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, विदेशी मुद्रा विभाग, ईसीबी विभाग, भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, ११ वा मजला, फोर्ट, मुंबई ४००००१ ह्यांना (आणि ईमेलद्वारे एमएस एक्सेल फाईल* fedcoecbd@rbi.org.in *येथे) डिसेंबर २००४ पासून, ती पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत पोहोचेल अशी पाठवावी.*

*२.३.८.(४) भारतात दिलेल्या प्रतिभूतीविरुध्द विदेशात दिलेली कर्जे*

*अधिसूचना क्र. फेमा,८/२००० आरबी दि मे ३,२००० च्या विनियम ४(२) अन्वये, एखादा प्राधिकृत डीलर, भारताबाहेर निवासी असलेल्या व्यक्तीने घेतेलेले कर्ज, दायित्व अथवा अन्य जबाबदारीच्या बाबतीत हमी देय शकते. मात्र असे कर्ज, दायित्व, किंवा जबाबदारी ही विश्वसनीय अशा व्यापारी व्यवहाराच्या संबंधात, भारतात रहिवासी असलेल्या व्यक्तीवर आली असावी. मात्र अशा हमीसाठी विदेशात असलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या बँकेने प्रति हमी दिली असावी.*

*२.३८.(५) अनिवासी व्यक्तींसाठी हमी*

*रिझर्व बँकेने तीची अधिसूचना क्र. फेमा/८/२००० दि ३ मे २००० अन्वये, एडी बँकांना, भारताबाहेर निवासी असलेल्या व्यक्तीचे कर्ज किंवा दायित्व किंवा जबाबदारीच्या बाबत, भारतात रहिवासी व्यक्तीच्या नावे, आरबीआयने वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार हमी देण्यास सर्वसाधारण परवानगी दिली आहे.*

*२) एडी बँकां त्यानुसार, त्यांच्या विदेशातील शाखा/सहप्रतिवादी किंवा आंतरराष्ट्रीय ख्यातीची बँक ह्यांच्या वतीने, अनिवासी व्यक्तींचे कर्ज, दायित्व किंवा जबाबदारी ह्याबाबतच्या विश्वसनीय व्यवहारांसंबंधी, भारतात निवासी असलेल्या व्यक्तींच्या नावे हमी/परफॉर्मन्स बाँड्स देऊ शकतात. मात्र त्या हमी/बाँड साठी, विदेशातील मुख्य कार्यालय/शाखा/सहप्रतिवादी किंवा आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या बँकेने प्रतिहमी देली असली पाहिजे.*

*३) प्राधिकृत डिलर बंकांनी खात्री करुन घ्यावी की, अशा प्रतिहमींचे नीट मूल्यांकन करण्यात आले आहे आणि अशा प्रतिहमींविरुध्द त्यांनी दिलेल्या हमीएक नेहमीची रीत म्हणून दिलेल्या नाहीत, विदेशातील मुख्य कार्यालय/शाखा/सहप्रतिवादी/आंतरराष्ट्रीय ख्यातीची बँक ह्यांनी दिलेल्या प्रतिहमींविरुध्द हमी देण्यापूर्वी, एडी बँकांनी स्वतःचे समाधान करुन घ्यावे की, ती प्रतिहमी आवाहित केली असता त्याखालील दायित्वे त्या विदेशी बँकेद्वारे ताबडतोब पूर्ण केली जातील. प्रतीहमी देणाऱ्या विदेशी बँकेकडून केली गेली असल्यासच प्रदान केले जाईल, ह्या अटीवर, प्राधिकृत डीलर बँक हमी देण्यास तयार असल्यास, ही बाब लाभार्थीला त्या हमी करारनाम्यात स्पष्ट करण्यात यावी.*

*४) हमी आवाहित केली गेल्यावर, प्राधिकृत डीलर बँका, निवासी लाभार्थीना रुपयांच्या स्वरुपात ताबडतोब प्रदान करु शकतात आणि त्याचवेळी प्रतिहमी देणाऱ्या विदेशी बँकेकडून परतफेड/भरपाई मिळविण्याची व्यवस्था करु शकतात.*

*५) विदेशी बँकांच्या हमी आवाहित केल्या गेल्यावरही प्राधिकृत बँकांना प्रदान मिळण्याच्या बाबतीत, अशी प्रकरणे, त्या बँकांनी त्या हमीखालील रक्कम परत मिळविण्यासाठी केलेल्या उपायांसहित, रिझर्व बँकेला कळवावीत.*

*६) प्रवासी चेक्स देणाऱ्या विदेशी संस्था किंवा संपूर्णपणे मुद्रा विनियम व्यवहार करणाऱ्या व रिझर्व बँकेकडून वैध परवाना मिळविणाऱ्या त्यांच्या घटक संस्थांच्या नावे, त्यांनी साठवून ठेवलेल्या कोऱ्या चेक्सच्या बाबतीत*

*प्राधिकृत डीलर बँका हमी देऊ शकतात. मात्र ह्यासाठी अशा संस्थांकडून सुयोग्य अशी प्रतिहमी मिळालेली असावी. हमी आवाहित केली गेल्यास, प्राधिकृत डीलर बँका प्रेषण करु शकतात परंतु त्याबरोबरच, सर्व माहिती असलेला एक वेगळा अहवाल, मुख्य महाव्यवस्थापक, विदेशी मुद्रा विभाग, (फोरेक्स मार्केट्स विभाग), भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, मुंबई - ४०००01 ह्यांना पाठविला जाईल.*

*२.३.८.(६) विदेशात गुंतवणुक - विदेशातील संपूर्ण मालकीच्या दुय्यम संस्था(डब्ल्यु ओ एस/संयुक्त उद्योग (जे व्ही) ह्यांच्या वतीने हमी*

*१ सध्या भारतीय पक्षाच्या ओवरसीज जेवी/डब्ल्यु ओ एस, जे व्ही/डब्ल्यु ओ एसला हमी दिलेले कर्ज, प्रदर्शन हमी आणि जेवी/डब्ल्यु ओ एच्या वतीने वितरीत केल्या गेलेल्या प्रदर्शन हमीचा सहभाग असलेल्या ताळेबंदाच्या शेवटच्या लेखापरिक्षणाच्या तारखेला असलेल्या निव्वळ मूल्याच्या ४०० टक्के मर्यादा आहे. भारतीय पक्ष कोणत्याही प्रकारची हमी देऊ शकते-कार्पोरेट किंवा व्यक्तीगत/प्राथमिक किंवा अनुषंधिक/प्रायोजक कंपनीकडुनची हमी/कंपनी समुहाकडुन किंवा सहकारी किंवा सहयोगी कंपनीकडुन असलेली हमी, त्यासाठीच्या अटि खालील प्रमाणे आहेतः*

a. *भारतीय पक्षाने परदेशात गुंतवणुक करण्यासाठीच्या एकुण मर्यादेत म्हणजेच भारतीय पक्षाच्या ताळेबंदाचे परिक्षण झालेल्या शेवटच्या तारखेच्या निव्वळ मूल्याच्या ४०० टक्के येत असलेल्या हमीच्या सर्व स्वरुपांचा सहभाग असलेल्या सर्व आर्थिक वचनबध्दता;*

b. *कोणतीही हमी ओपन एंडेड स्वरुपाची नसेल म्हणजे रक्कम आणि हमीचा कालावधी आधी स्पष्ट केला जाईल.प्रदर्शन हमीच्या स्थितीत संबंधीत प्रदर्शन हमीचा वैध कालावधी करार पूर्ण होण्यासाठी दिलेला कालावधी असेल.*

c. *प्रदर्शन हमी कराराचे नुतनीकरण असलेल्या स्थितीत, आर्थिक वचनबध्दतेसाठी भारतीय पक्षाच्या निव्वळ मूल्याकनाच्या ४०० टक्के एवढी मर्यादा असेल, अशा नुतनीकरणासाठी भारतातुन रक्कम देण्यासाठी भारतीय पक्षाने रिझर्व बँकेची पूर्वपरवानगी घेणे गरजेचे आहे.*

d. *कार्पोरेट हमीच्या स्थितीत, सर्व हमी (प्रदर्शन हमीचा सहभाग करुन )रिझर्व बँकेला ओडिआय भाग **च्या स्वरुपात निर्देशित करणे आवश्यक आहे. भारतीत बँकांनी डब्ल्यु ए एस/भारता बाहेरील जेवीच्या साठी दिलेल्या हमी या मर्यादेबाहेर असतील आणि त्या रिझर्व बँकेने (डिबीओडी) वेळोवेळी जाहिर केलेल्या महत्वपूर्ण अटि/नियमांनुसार असतील.*

*२ थेट सबसिडी कार्यान्वयीत कंपनी किंवा एस पी वी आहे याला विचाराधीन न घेता असा निर्णय घेण्यात आला आहे की, परदेशात थेट गुंतवणुकिसाठी सद्यस्थितीतील मर्यादेमध्ये स्वयंचलित मार्गाच्या अंतर्गत फर्स्ट जनरेशन स्टेप डाऊन ऑपरेटिंग कंपनीच्या वतीने भारतीय प्रायोजक संस्था कार्पोरेट हमीला वाढवू शकते.*

*३ द्वितीय पिढी किंवा संबंधीत पातळीवरील कार्यान्वयीत सबसिडिअरीजच्या वतीने कार्पोरेट हमीच्या वितरणाला, रिझर्व बँकेद्वारे मंजूरी मार्गाच्या अंतर्गत विचाराधीन घेतले जाईल, त्यासाठी भारतीय पक्षाचे ज्यासाठी हमी देण्यात येणार आहे, असे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या परदेशी सबसिडीमध्ये ५१ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त स्टेक असणे गरजेचे आहे.*

*२.४ आंतर - कंपनी ठेवी/कर्जे ह्यांच्या हमींवरील निर्बंध*

*बँकांनी आंतर कंपनी ठेवी/कर्जे ह्यावरील हमी देऊ नयेत. एनबीएफसी/इतर एनबीएफसी कंपन्यांनी स्वीकारलेल्या ठेवी/कर्जे ह्यांच्या परताव्याची देऊ नये.*

*२.४.१ <u>एनबीएफसींमध्ये निधी ठेवण्याबाबतच्या हमींवरील निर्बंध</u>*

*ह्या सूचना, एनबीएफसींद्वारा, ट्रस्ट्स व अन्य संस्थांकडून स्वीकारलेल्या ठेवी/कर्जे ह्यासह, कोणत्याही स्त्रोतांमधून आलेल्या सर्व प्रकारच्या ठेवी/कर्जे ह्यांना लागु आहेत. एनबीएफसींमध्ये अप्रत्यक्षपणे ठेवी ठेवण्यासाठी साह्यभूत होण्यासाठी हमी देण्यात येऊ नयेत.*

*२.४.२ <u>आंतर - संस्था हमींवरील निर्बंध</u>*

*२.४.२. (१) आंतर -संस्थीय ठेवी/कर्जे ह्यासाठी बँकांनी हमी देऊ नयेत. त्याच प्रमाणे, अबँकीय संस्थांमध्ये ठेवी ठेवण्यास अप्रत्यक्षपणे साह्यभूत होण्यासाठी हमी दिल्या जाऊ नयेत. ह्या सूचना/अटी, कोणताही स्त्रोत असला तरी सर्व प्रकारच्या ठेवी/कर्जे ह्यांना लागु आहेत. उदा. ट्रस्ट्स व अन्य संस्थांकडून अबँकीय संस्थांनी स्वीकारलेल्या ठेवी/कर्जे.*

*२.४.२ (२) एका अबँकीय कंपनी कडून दुसऱ्या अबँकीय कंपनीला उपलब्ध करुन दिलेल्या निधीबाबत, पुढील प्रकारचे व्यवहार हे बँकांनी दिलेल्या हमींच्या स्वरुपाचे आहेत व त्यामुळे बँकांनी असे व्यवहार करु नयेतः-*
*अ) एका विक्रेत्याने खरेदीदारावर १२० ते १८० दिवसांच्या वापराची बिले काढली आणि ती खरेदीदाराने स्वीकारली. तसेच त्याच्या बँकेनेही त्यांचा सहस्वीकार केला. विक्रेत्याने अकोमोडेटिंग कंपनीबरोबर ही बिले डिसकाउंट केली. व तिने ही बिले ड्यु डेटपर्यंत ठेवून दिली. सहस्वीकार करणाऱ्या बँकेने, त्यांचा ग्राहक असलेल्या खरेदीदाराच्या कॅश क्रेडिट खात्यामधील स्टॉकमुळे निकासी अधिकार (ड्रॉईंग पॉवर) विरुध्द ह्या बिलांखाली येणाऱ्या दायित्वांसाठी निधी राखून ठेवला.*

*ब) अकोमडेटिंग कंपनीने, बँकेच्या कर्जदारांकडे बँकेच्या हमीखाली, एका विशिष्ट कालावधीसाठी ठेवी ठेवल्या. अशा बाबतीतही, बँकेने कॅश क्रेडिट खात्यात उपलब्ध असलेल्या ड्रॉईंग पॉवर विरुध्द रक्कम राखून ठेवली.*

*२.४.२ (३) अ) इतर बँका/ वित्त संस्था/इतर कर्जदारी संस्था ह्यांच्या नावे त्यांनी दिलेल्या कर्जांसाठी बँका हमी देऊ शकतात. मात्र त्यासाठी पुढील अटींचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजेः-*

*१) बँकेच्या संचालक मंडळाने बँकेच्या जोखीम व्यवस्थापन प्रणालींची एकात्मता/सुदृढता ओळखून त्यानुसार ह्याबाबत नीट धोरण ठेवले पाहिजे. संचालक मंडळाने मंजुर केलेल्या धोरणात पुढील बाबी असाव्यातः*

*अ) इतर बँका/वित्त संस्था/इतर कर्जदायी संस्था ह्यांच्या नावे हमी देण्यासाठी, बँकेच्या टियर-१ भांडवलाशी संबंधित प्रुडेन्शियल नॉर्म्स.*
*ब) प्रतिभूती व मार्जिन ह्यांचा प्रकार व व्याप्ती.*
*क) अधिकार दिले जाणे.*
*ड) अहवाल देण्याची प्रणाली.*
*ई) नियतकालिक पुनरावलोकन.*

*२) अशी हमी ही केवळ कर्जदार घटकांसाठीच व त्यांना इतर बँका/वित्त संस्था/इतर कर्जदायी संस्था ह्यांच्याकडून अतिरिक्त कर्जसुविधा मिळविण्यासाठी दिली जाईल.*
*३) हमीदाता बँकेने, हमी दिलेल्या जोखमीच्या (एक्सपोजर) किमान १० % निधियुक्त (फंडेड) जोखमी घ्यावी.*
*४) विदेशातील धनकोंना देता येण्यास योग्य असलेले धरुन, बँकांनी विदेशातील धनकोंच्या नावे हमी किंवा लेटर्स ऑफ कंफर्ट देऊ नयेत, तथापि, एडी बँकांनी, अधिसूचना क्र. फेमा ८/२००० -आरबी, दि. मे ३, २००० मधील तरतुदींचे मार्गदर्शन घ्यावे.*
*५) बँकेने दिलेली हमी ही, ज्यांच्या वतीने हमी देण्यात आली आहे त्या कर्जदार संस्थेसाठी एक जोखीम(एक्सपोजर) असेल आणि तिला विद्यमान मार्गदर्शक तत्वांनुसार जोखीम भार (रिस्क वेट) लागु होईल.*

६) फसवणुकींची शक्यता टाळण्यासाठी घोष समितीच्या शिफारशींचे व हमीबाबत अंतर्गत आवश्यकतांचे पालन केले जात आहे ह्याची बँकांनी खात्री करुन घ्यावी.
७) अलिकअडील काळात, काही विशिष्ट बँका, कॉर्पोरेट संस्थांच्या वतीने, त्या संस्थांनी दिलेल्या अपरिवर्तनीय डिबेंचर्सच्या बाबतीत हमी देत आहेत. येथे स्पष्ट करण्यात येत आहे की, विद्यमान सूचना ह्या केवळ कर्जांनाच लागु आहेत - बॉंड्स किंवा कर्ज संलेखांना नव्हे. एखाद्या कॉर्पोरेट बॉंडसाठी किंवा कर्ज संलेखासाठी बँकिंग प्रणालीने दिलेल्या हमींमध्ये केवळ प्रणालीय गर्भितार्थच असतो असे नव्हे तर त्यामुळे खऱ्या कॉर्पोरेट कर्ज - बाजाराच्या विकासावरही अनिष्ट परिणाम होतो. बँकांना सांगण्यात येत आहे की त्यांनी विद्यमान विनियमांचे काटकोरपणे पालन करावे आणि विशेष म्हणजे, कोणत्याही प्रकारचे बॉंड्स किंवा कर्ज संलेख देण्याबाबत हमी किंवा त्यांच्या सममूल्य बांधिलकी देऊ नये.

२.४.२.(३)ब) <u>कर्जदायी बँका</u>

इतर बँका/वित्तसंस्थांनी दिलेल्या हमींविरुद कर्ज सुविधा देऊ करण्याऱ्या बँकांनी पुढील अटींचे काटेकोरपणे पालन करावेः-
१) दुसऱ्या बँकेने/वित्त संस्थेने दिलेल्या हमींच्या विरुध्द, बँकेला आलेली जोखीम ही हमीदाता बँक/वित्त संस्था ह्यावरील जोखीम (एक्सपोझर) समजली जाईल व त्यासाठी विद्यमान मार्गदर्शक तत्वांनुसार जोखीमभार लागु होईल.
२) इतर बँकांनी दिलेल्या हमींच्या विरुध्द आलेल्या जोखमी ह्या संचालक मंडळाने विहित केलेल्या आंतर बँकीय जोखीम मर्यादांमध्ये असाव्यात. अन्य बँक/वित्त संस्था त्यांच्या हमीविरुध्द आलेली जोखीम ही, नाणेबाजार विदेशी मुद्रा व प्रतिभूती बाजारातील आंतर-बँकीय व्यवहारांमधील जोखमींपेक्षा अधिकतर कालावधीची असल्याने, अशा जोखमींमुळे धोका वाढत असल्याच्या कारणामुळे , संचालक मंडळाने दीर्घकालीन जोखमींसाठी सुयोग्य अशी पोट मर्यादा ठरवावी.
३) हमीदाता बँक/वित्तसंस्था ह्याबाबत आलेल्या जोखमींवर बँकांनी सातत्याने देखरेख ठेवावी आणि बँकेच्या संचालक मंडळाने विहित केलेल्या प्रुडेन्शियल मर्यादा/पोट मर्यादा तसेच आरबीआयने वित्तसंस्थांसाठी विहित केलेल्या, एकमेव कर्जदाराबाबतच्या प्रुडेन्शियल मर्यादांचे पालन करावे.
४) फसवणुकींची शक्यता टाळण्यासाठी घोष समितीच्या शिफारशींचे व हमीबाबत अंतर्गत आवश्यकतांचे पाळन केले जात आहे ह्याची बँकांनी खात्री करुन घ्यावी.

२.४.२.(४) <u>अपवाद</u>
१) आजारी/दुर्बल औद्योगिक एककांच्या पुनर्वसनाच्या बाबतीत, अपवादात्मक प्रकरणांमध्ये लिक्वीडिटी - निर्बंधामुळे जेथे पुनर्वसन करावयाच्या पॅकेजमध्ये भाग घेऊ शकत नाहीत तेथे संबंधित बँकांनी, ज्या अन्य बँका हा अतिरिक्त भार उचलण्यास तयार आहेत, त्या बँकांच्या नावे हमी द्यावी. त्या हमींवर अतिरिक्त वित्त देणाऱ्या बँकांना भरपाई मिळे पर्यंत अशा हमी विद्यमान राहतील.
२) पायाभूत सोयी प्रकल्पांबाबत, बँका, अन्य कर्जदायी बँकांच्या नावे हमी देऊ शकतात. मात्र, हमी देणाऱ्या बँकेने त्या प्रकल्प खर्चाच्या ५ टक्कयांपर्यंत, त्या प्रकल्पात निधीयुक्त भाग घेतला असावा आणि प्रकल्पाचे सर्वसाधारण ऋण -मूल्यांकन, देखरेख व पाठपुरावा केला पाहिजे.
३) यंत्रसामग्री विकण्यासाठी, आयडीबीआय बँक लि. आणि एसआयडीबीआय, पीएफसी इत्यादींद्वारा चलित, सेलर्स लाईन ऑफ क्रेडिट योजनेबाबत, (ज्यास नंतर डायरेक्ट डिसकाउंटिंग योजना असे नाव दिले गेले) खरेदीदारावर बिले काढून, विक्रेत्याची बँक विक्रेत्याला प्राथमिक कर्ज उपलब्ध करुन देते आणि विक्रेत्याच्या बँकेला, खरेदीदाराकडे असलेल्या त्या व्यवहाराच्या सिक्युरिटीला हात लावू शकत नाही. त्यामुळे खरेदीदारांच्या बँकांना, सेलर्स लाईन ऑफ क्रेडिटखाली, हमी/सहस्वीकार सुविधा देण्याची परवानगी आहे.
४) त्याचप्रमाणे, हुडको, राज्य गृहनिर्माण मंडळे आणि तत्सम संस्था ह्यांनाही, एखाद्या मालमत्तेला स्पष्ट व विपणन योग्य शीर्षक न देऊ शकणाऱ्या खाजगी कर्जदारांना त्यांनी दिलेल्या कर्जांसाठी हमी दिल्या जाऊ शकतात. मात्र त्यासाठी, अशा कर्जदारांची अशा कर्जांची परतफेड करण्याची क्षमता आहे ह्याबाबत बँकांचे समाधान झाले असावे.
५) बँका त्यांच्या घटकांच्या वतीने, विकास संस्था/ इंडीयन रिन्युएबल एनर्जी डेवलपमेंट एजन्सी नॅशनल हॉर्टिकल्चर बोर्ड ह्यासारख्या संस्थांच्या नावे, सॉफ्ट लोन्स, आणि/किंवा इतर प्रकारची विकाससाह्ये ह्यासाठी हमी देऊ शकतात.

*२.४.२.५) <u>पायाभूत सोयी प्रकल्प</u>*

*पायाभूत सोयींच्या प्रकल्पांना कर्ज देण्याबाबतचे खास गुणविशेष नजरेसमोर ठेवून -उदा. धनकोंच्या बाजूने मूल्यांकन करण्यासाठी लागणारी उच्चतर कौशल्ये व त्या प्रकल्प कालाशी जुळणाऱ्या परिपक्वतेच्या स्त्रोतांची उपलब्धता - इतर कर्जदायी संस्थांच्या नावे, केवळ पायाभूत सोयी प्रकल्पांच्या बाबतीतच बँकांना स्वतःच्या मतानुसार हमी देण्यास मुभा आहे. मात्र त्यासाठी पुढील अटी पूर्ण केल्या जाव्यातः-*

*१) हमी देणाऱ्या बँकेने त्या प्रकल्प खर्चाच्या ५ टक्कयांपर्यंत, त्या प्रकल्पात निधीयुक्त भाग घेतला असावा आणि प्रकल्पाचे सर्वसाधारण ऋण -मूल्यांकन, देखरेख व पाठपुरावा केला पाहिजे.*

*२) हमीदाता बँकेला, कॅपिटल अ‍ॅडेक्वसी, क्रेडिट एक्सपोझर, इनकम रेकग्निशन संबंधीचे निकष, मालमत्ता वर्गीकरण व तरतुदी करणे इत्यादींसारख्या प्रुडेन्शियल विनियमांचे अनुपालन केले गेले असल्याचा पूर्वेतिहास असावा.*

*२.५ <u>आवाहित हमींचे प्रदान</u>*

*पूर्वी आयडीबीआयद्वारा चलित ही योजना आता आयडीबीआय बँक लि. द्वारा चालु ठेवण्यात आली आहे.*

*२.५.१ जेथे हमी आवाहित केल्या जातात तेथे त्याबाबतचे प्रदान लाभार्थींना विनाविलंब व विना आक्षेप केले गेले पाहिजे. हमीं बाबत अशी ताबडतोब कृती केली जाईल ह्याची खात्री करण्यासाठी योग्य अशी कार्यकृती ठरविण्यात यावी. त्यामुळे, कायदेशीर सल्ला घेण्यात येत आहे किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांची मंजुरी घेण्यात येत आहे अशा सबबी टाळता येतील.*

*२.५.२ अशा हमींचा त्या आवाहित केल्यावर मान राखवण्यात विलंब झाल्यास, बँक हमींचे मूल्य हमी-योजनेचे पावित्र्य, व बँकेची प्रतिमा खराब करण्यासारखे आहे. तसेच त्यामुळे दुसऱ्या पक्षांना कोर्टामध्ये जाऊन ताकीद आदेश मिळविण्याची संधी मिळते. सरकारी खात्यांच्या नावे असलेल्या हमींबाबत, ह्यामुळे महसूल गोळा करण्यात विलंब तर होतेच पण ह्याशिवाय, बँका व त्यांचे पक्ष ह्यांचे संगनमत असल्याची भावना निर्माण होते व त्यामुळे बँकेची प्रतिमा मलीन होते.*

*२.५.३ ज्यांच्या वतीने हमी दिल्या गेल्या आहेत त्या व्यक्ती, परफॉर्मन्स हमीच्या बाबतीत अशा व्यक्ती त्यांच्या स्वतःच्याच स्त्रोतांमधून त्यांची दायित्वे, गरज पडेल तेव्हा पूर्ण करतील ह्याची खात्री करुन घेण्यासाठी, हमी व्यवहार प्रक्रियेसाठी एक परिणामकारक प्रणाली असणे आवश्यक आहे.*

*२.५.४ बँकांच्या सर्वोच्च व्यवस्थापनाचे, हमी आवाहित केल्या गेल्यावर त्यांचे प्रदान ताबडतोब करण्यासाठी योग्य अशी यंत्रणा अथापित करण्याच्या गरजेबाबत वैय्यक्तिकरीत्या लक्ष द्यावे. त्यामुळे तक्रारीसाठी जागा उरणार नाही. विशेषतः सरकारी खात्यांकडून दिलेल्या हमींचा मान न राखला गेल्याच्या तक्रारी केल्या गेल्यास, बँकेच्या सर्वोच्च व्यवस्थापनाने, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यासह त्या तक्रारींमध्ये व्यक्तिशः लक्ष घालावे.*

*२.५.५ ह्या बाबतीत दिल्ली उच्च न्यायालयाने, हमी आवाहित केल्यावर त्यांचे प्रदान लगेच न केल्याबाबत काही बँकांवर ताशेरे झाडले आहेत. असे दिसून आले आहे की, बँक हमी म्हणजे बँक व लाभार्थी ह्या दोघामधील एक करार/कंत्राट आहे. लाभार्थीने बँक हमी आवाहित केल्यावर आणि त्या बँक हमीच्या अटींनुसार ती आवाहित करण्याबाबतचे पत्र पाठविल्यावर, बँकेने लाभार्थीला प्रदान करणे बंधनकारक आहे.*

*२.५.६ सर्वोच्च न्यायालयाने निर्देशित केले आहे की (युपी कोऑपरेटिव फेडरेशन प्रा.लि. विरुध्द सिंग कन्सल्टंट्स अँड इंजिनियर्स प्रा.लि. (१९८८ आयसी एसएससी १७४)) बँकेचे दिलेली आश्वासने ही कोर्टाच्या हस्तक्षेपाशिवाय पूर्ण केली गेली पाहिजेत. एका प्रकरणामधील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाडया मधील सबंधित उतारा खाली दिल्याप्रमाणे आहे. “ह्यासाठी आमच्या मताने, कायदा असा आहे की, बँकेने दिलेली आहवासने/दायित्वे ही कोर्टाच्या हस्तक्षेपा विना तिने पूर्ण केली पाहिजेत आणि केवळ अपवादात्मक प्रकरणातच म्हणजे, फसवणुकीचे प्रकरण, किंवा बँक हमी चे रोखीकरण करु दिल्यास परत न मिळण्याजोगा अन्याय होईल असे प्रकरण, अशा अपवादात्मक प्रकरणांमध्येच कोर्टाचे हस्तक्षेप करावा”.*

*२.५.७ असे प्रसंग टाळण्यासाठी, बँकांसाठी हे अत्यंत आवश्यक आहे की, निधी आधारित मर्यादांच्या बाबतीत त्याची सावधानता घेतात तशाच प्रकारे हमींसाठी आलेल्या प्रस्तावांचेही मूल्यमापन त्यांनी करावे आणि मार्जिनच्या रुपाने योग्य असे कव्हर घेतल्यास हमी आवहित केल्या गेल्यावर बँकांनी त्यांचा मान राखल्यावर, प्रदान करण्याबाबतची कसुरी करण्याची त्या घटाकांनी प्रवृत्ति टाळता येइल.*

*२.५.८.१) बँक हमी योजना सुरळितपणे चालावी ह्यासाठी, त्या नीटप्रकारे चालत आहेत ह्याबाबत सरकारी विभाग असमाधानी होत नाहीत ह्याची खात्री करुन घेणे अत्यावश्यक*
*आहे. हमी करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार आणि बँकांवर कोर्टाचा निर्बंध घालणारा आदेश नसल्यास,सरकारी विभागांनी त्या हमी आवाहित केल्यावर बेकांनी,त्यांनी दिलेल्या हमींचा मान विनाविलंब विनाहरकत राखला जाईल ह्याबाबत बँकांनी खात्री करुन घेणे आवश्यक आहे.*
*२) आवाहित केलेल्या हमीचा मान व राखण्याच्या निर्णय हा काळजीपूर्वक विचार करुन बऱ्याच वरच्या स्तरावर आणि भारतीय कॉंट्रॅक्ट अधिनियमाखाली, त्या हमीच्या अटी व शर्तीनुसार प्रदान करणे योग्य बँकेचे समाधान झाले असल्यासच घेतला जावा.*
*३) सरकारी विभागांकडून आलेल्या अशा तक्रारींची जबाबदारी स्वतः मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने घ्यावी. अधल्या कार्यकारी कर्मचाऱ्यांना पुरेसे अधिकार दिले जावेत त्यामुळे वरील अधिकाऱ्याचा संदर्भ घेतला जाण्यामुळे होणारा विलंब होणार नाही.*
*४) हमींचा मान ताबडतोब राखण्यासाठी बँकांनी एक सुयोग्य कार्यरीत सुरु करावी. त्यामुळे, कायदेशीर सल्ला घेण्यात येत आहे किंवा वरिष्ट अधिकाऱ्यांची मंजुरी घ्यावयाची आहे अशा सबबींमुळे होणार नाही.*
*५) हमींचे वेळेवर प्रदान न केले जाण्याबाबत, कर्मचाऱ्यांचे उत्तरदायित्व निश्चित करण्यात यावे आणि सर्व स्तरांवरील अपराधी अधिकाऱ्यांबाबत, कामावरुन काढून टाकले जाणे ह्यासारखी कडक शिस्तीची कारवाई केली जावी.*
*६) उच्च न्यायालयाने दिलेल्या अस्थायी आदेशाबाबत, डिफरेंशियल ड्युटीच्या रकमेसंबंधाने जेथे बँकांनी कस्टम्स व केंद्रीय एक्साईज अधिकरणांच्या नावे बँक हमी दिल्या आहेत, तेथे कोर्टाच्या स्थगन आदेशाची समाप्ति झाल्यावर त्या हमी आवाहित केल्यावर लगेच त्या हमीची रक्कम देण्यात यावी. बँकांनी, त्यांच्या तरलता स्थितीवर परिणाम होईल ह्या सबबीवर ती रक्कम देणे अडकवून ठेवू नये.*

*२.५.९ वित्त मंत्रालयांकडून ही तक्रारी आल्या आहेत की, राजस्व विभाग, भारत सरकार ह्यासारख्या काही विभागांना, निरनिराळ्या कोर्टांनी त्यांच्या हितात दिलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे कठीण जात आहे कारण, जोपर्यंत अशा कोर्ट-निर्णयांच्या प्रमाणित प्रती ते विभाग सादर करत नाहीत तोपर्यंत बँका त्यांच्या हमींचा मान राखत नाहीत. अशा प्रसंगी बँकांनी पुढील कार्यरीत अवलंबावी:-*
*१) जेथे, बँक हमीची अंमलबजावणी करण्यासाठी, सरकारने केलेल्या कारवाईमध्ये ती बँक एक पक्ष असेल व कोर्टाने त्या प्रकरणाचा निर्णय सरकारच्या बाजूने दिल्या असेल, तेथे बँकांनी त्या निर्णयाच्या प्रामाणित प्रतीचा आग्रह धरु नये, कारण तो निर्णय/आदेश, खुल्या कोर्टात, दोन्हीही पक्ष/त्यांचे वरील ह्यांच्या उपस्थितीत दिलेला असतो व तो बँकेला कमाहित झालेला असतो.*
*२) कारवाईमध्ये बँक हा एक पक्ष नसल्यास, हायकोर्टाचा निबंधक/उप किंवा दुय्यम निबंधकाने प्रमाणित केलेली आदेशाची स्वाक्षरीयुक्त प्रत किंवा सरकारी वकीलाने सत्यांकन केलेली हायकोर्टाच्या निर्णयाची सत्य प्रतिलिपी ही, हमीदाता बँकेने हायकोर्टाच्या त्या आदेशाविरुध्द विनंती अर्ज सादर करावयाचे ठरविले नसल्यास, त्या हमीखालील दायित्व पूर्ण करण्यास पुरेशी आहे.*
*३) हमी करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार, बँकांनी त्यांनी दिलेल्या हमींचा मान राखला पाहिजे. त्यात कोणताही दावा असल्यास, हमीबाबतचे दायोत्व निषेधपूर्वक केले जावे आणि दाव्यासंबंधी बाबीचा वेगळा पाठपुरावा केला जावा.*
*४) सरकारने त्याच्या वतीने निरनिराळ्या सरकारी विभागांना सल्ला दिला आहे की, हमींच्या अटी व शर्तीनुसार व हमी करारनाम्यात दिल्यानुसार कसुरी झाली आहे काय ह्याबाबत, वरिष्ठ स्तरावर काळजीपूर्वक विचार करुनच त्या हमी आवाहित कराव्यात.*
*५) आवाहित केलेल्या हमीखालील दायित्वे पूर्ण करण्याबाबतच्या सूचनांचे पालन न केले गेल्यास, त्याची गंभीर दखल रिझर्व बँकेद्वारे घेतली जाईल आणि रिझर्व बँकेला अशा बँकांविरुध्द कडक कारवाई करणे भाग पडेल.*

२.६ बिलांचा सहस्वीकार

२.६.१ सर्वसाधारण

*रिझर्व बँकेला असे दिसून आले आहे की, काही बँका त्यांच्या ग्राहकांच्या बिलाचा सहस्वीकार करतात आणि इतर बँकांनी सहस्वीकार केलेली बिले बिनदिक्कत डिस्काउंट ही करतात. अशी बिले ही अंततः, एखाद्या सिस्टर कंपन्यांच्या गटांनी एकमेकांवर काढलेली तडजोडीची बिले असतात. आणि त्यात कोणताही खरा व्यवहार झालेला नसतो अशी बिले डिस्काउंट करताना, केवळ इतर बँकांनी दिलेला सहस्वीकार पाहूनही महत्वाची बाब नजरेआड करतात. ही बिले परिपक्व झाल्यावर आदेशितींद्वारा भरली जात नाहीत आणि त्यांचा सहस्वीकार करणाऱ्या बँकांना त्या बिलांची रक्कम भरावी लागते आणि ती रक्कम, अशा बिले काढणाऱ्या/आदेशितींकडून वसूल करणे त्या बँकांना अवघड होते. काही नागरी सहकारी बँकांनी सहस्वीकार केलेली मोठ्या रकमांची बिले ही बँका डिस्काउंट करतात. अशी बिले परिपक्व झाल्यावर त्यांची रक्कम दिली जात नाही आणि त्यांचा सहस्वीकार करणाऱ्या सहकारी बँकांना ती रक्कम भरणे कठीण होते. येथे, सहस्वीकार करणाऱ्या बँकांची, त्या बिलांचा जरुर पडल्यास मान ठेवण्याबाबतची क्षमता व आर्थिक परिस्थिती लक्षात घेतली जात नाही. अशीही प्रकरणे दिसून आली आहेत की, बँकेच्या पुस्तकात सहस्वीकाराबाबतची तपशीलवार माहिती नोंदवून ठेवण्यातच आलेली नाही. परिणामी, अशा प्रकरणांचे प्रमाण/व्याप्ती तपासणीमध्ये कळून येत नाही आणि डिस्काउंट करणाऱ्या बँकेकडून दावा शाबित केल्यावरच मुख्य कार्यालयाला त्या सहस्वीकाराची जाणीव होते.*

२.६.२ सुरक्षा उपाय

*वरील बाबींचा विचारात घेता बँकांनी पुढिल सुरक्षा उपाय नजरेसमोर ठेवावेतः-*
*१) त्यांच्या ग्राहकांना सहस्वीकार मर्यादा मंजुर करताना, त्याबाबतची गरज पडताळून पहावी आणि त्या बँकेच्या अन्य मर्यादांचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांनाच अशा मर्यादा देऊ कराव्यात.*
*२) केवळ खऱ्या व्यवहाराच्या बिलांचाच सहस्वीकार करावा आणि बँकांनी खात्री करुन घ्यावी की सहस्वीकार केलेल्या बिलांवरील माल कर्जदाराच्या स्टोअर खात्यात खरोखरच जमा झाला आहे.*
*३) सोबत जोडलेल्या इनव्हॉईसमध्ये निर्देशित केलेल्या मालाचे मूल्यांकन पडताळून पहावे की एकूण स्टॉक (माल)चे अधिकतर/ज्यादा मूल्यांकन केलेले नाही.*
*४) गटातील कंपन्यांनी एकमेकांवर काढलेल्या हाउस बिल्स/अकोमडेशन बिल्स ह्यासाठी बँकांनी सहस्वीकार सुविधा देऊ नये*
*५) इतर बँकांनी सहस्वीकार केलेल्या बिलांना डिस्काउंट करणाऱ्या बँकांनी खात्री करुन घ्यावी की ती तडजोडीची बिले नाहीत आणि सहस्वीकार करणाऱ्या बँकेची, तशी गरज पडल्यास, दायित्व पूर्ण करण्याची क्षमता आहे.*
*६) इतर बँकांनी सहस्वीकार केलेल्या बिलांना डिस्काउंट करणाऱ्या बँकांसाठी, प्रत्येक बँकेचा आकार लक्षात घेऊन, बँक-निहाय मर्यादा ठरविल्या जाव्यात आणि इतर बँकांमधिल संबंधित अधिकाऱ्यांचे अधिकार काय आहेत हे डिस्काउंट करणाऱ्या बँकांमध्ये नोंदवले जावेत.*
*७) कोणत्याही बँकेची सहस्वीकार - करण्याची जबाबदारी, तिच्या ज्ञात असलेल्या स्त्रोत -परिस्थितीच्या प्रमाणाबाहेर नाही ह्याची काळजी घेतली जावी.*
*८) सहस्वीकार करणाऱ्या बँकाची, देणे असलेल्या बिलांबाबतच्या जबाबदाऱ्यांना नियतकालिक दुजोटा मिळविण्यासाठी एखादी प्रणाली सुरु करण्यात यावी.*
*९) प्रत्येक ग्राहकांबाबतचे दायित्व आणि प्रत्येक शाखेमधील दायित्वे लगेच पडताळून पाहता यावीत ह्यासाठी, प्रत्येक ग्राहकासाठी सहस्वीकार केलेल्या बिलांचे योग्य अभिलेख (रेकॉर्ड) ठेवले जावेत. आणि अंतर्गत निरीक्षकांद्वारे त्यांची छाननी केली जावून, त्यांच्या अहवालात त्याबाबतचे त्यांचे शेरे दिले जावेत.*
*१०) ज्यावेळी असे व्यवहार मोठे अथवा प्रमाणाबाहेर असल्याचे आढळून आल्यास, डिस्काउंट करणाऱ्या बँकेने, बिलांचा सहस्वीकार करणाऱ्या बँकेच्या मुख्य कार्यालयाला/नियंत्रक कार्यालयाला त्याबाबत कळविल्यास चांगले.*
*११) शाखा व्यवस्थापकांनी, त्यांनी केलेल्या सहस्वीकारांबाबतचे अहवाल नियंत्रक कार्यालयाला कळविण्यासाठी योग्य असे नियतकालिक अहवाल विहित करावेत.*

*१२) अशा अहवालांमध्ये, शकलेल्या बिलांची स्थिती व सहस्वीकार दायित्वाखाली बँकेला भरणा करावा लागला अशा बिलांचाही समावेश केला जावा. ह्यामुळे, शाखांनी पाठविलेल्या सहस्वीकारांवर, नियंत्रक कार्यालयांना देखरेख ठेवता येईल आणि कठीण प्रकरणात योग्य ती करण्यास मदत होईल.*
*१३) रु १०,०००/- व त्यावरील रकमेच्या सहस्वीकार बिलांवर दोन अधिकाऱ्यांच्या संयुक्तपणे सह्या असाव्यात. अपवादात्मक प्रकरणांमध्येच केवळ सूट दिली जावी. उदा. एखाद्या शाखेत दोन अधिकारीच नसल्यास.*
*१४) एकाच पक्षाकडून, रु २ लाख व त्या वरिल रकमेचा इतर बँकांकडून सहस्वीकार केलेली बिले डिस्काउंट /खरेदी करताना, त्या बँकेने, सहस्वीकार करणाऱ्या बँकेच्या, नियंत्रक (प्रादेशिक/क्षेत्रीय/विभागीय) कार्यालयाकडून, तसे करण्यास लिखित पूर्व मंजुरी घ्यावी व तिची नोंद करुन ठेवावी.*
*१५) एकमेव कर्जदार/कर्जदारांचा अट ह्यासाठी, डिसकाउंट/खरेदी केलेल्या सर्व बिलांची (इतर बँकांनी सहस्वीकार केलेल्या) एकूण रक्कम रु २० लाखापेक्षा अधिक असल्यास, डिस्काउंट करणाऱ्या बँकेने, सहस्वीकार करणाऱ्या बँकेच्या मुख्य कार्यालयाकडून लिखित स्वरुपात पूर्व मंजुरी घेतली पाहिजे.*

*२.६.३ बिलांचा सहस्वीकार करण्यामध्ये बँकांनी पाळावयाच्या सावधानतांशिवाय, हेही लक्षात ठेवले जावे की, आयडीबीआय बँक लि, आणि एसआयडीबीआय, पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन लि(पीएफसी) इत्यादि अखिल भारतीय वित्त संस्था ह्यांनी सुरु केलेल्या, बायर्स लाईन ऑफ क्रेडिटखाली, काढलेल्या बिलाचा सहस्वीकार करण्याबाबत बँकांना पायबंद घालण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, बँकांनी एनबीएफसींवर काढलेल्या बिलांचाही सहस्वीकार करु नये. ह्याशिवाय, एसआयडीबीआय योजनेखाली, बँकांनी, त्यांच्या खरेदीदारांच्या/घटकांच्या वतीने सहस्वीकार सुविधा देऊ नये असे बँकांना सांगण्यात येत आहे.*

*२.६.४ तथापि, आयडीबीआय बँक लि[२] ह्यांनी चालविलेल्या आणि आडीबीआय बँक लि द्वारा चलित बिल डिस्काउंट करणाऱ्या अखिल भारतीय वित्त संस्थांनी चालविलेल्या[३] आणि एसआयडीबीआय पीएफसी ह्यासारख्या वित्तसंस्थांनी चालविलेल्या, सेलर्स लाईन ऑफ क्रेडिट योजनांखाली (नंतर नाव डायरेक्ट बिल डिस्काउंटिंग स्कीम) काढलेल्या बिलांचा, खरेदाराची प्रदान करण्याची क्षमता असल्यास आणि ह्या बँकेने, वैय्यक्तिक/गट असलेल्या कर्जदारांसाठी विहित केलेल्या जोखमी निकषांचे पालन केले असल्यास, सहस्वीकार करु शकतात.*

*२.६.५ असेही काही प्रसंग घडले आहेत की, जेथे बँकांच्या शाखा त्यांच्या ग्राहकांच्या वतीने पतपत्रे उघडतात आणि अशा पतपत्रांच्या खाली काढलेल्या बिलांचा सहस्वीकारही करतात. कायद्यानुसार पाहिल्यास, एखाद्या बँकेने तिच्याच पतपत्राखाली काढलेल्या बिलाचा सहस्वीकार केल्यास, अशा रितीने सहस्वीकार केलेले बिल हे एक स्वतंत्र कागदपत्र ठरते. व्यापारी कर्जासाठी लागु असलेले खास नियम अशा बिलांना लागु होत नाहीत. आणि अशी बिले, विनिमय बिलांना लागु असलेल्या कायद्याखाली म्हणजे निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्टखाली येतात. अशा बिलाची वाटघाट करणाऱ्या बँकेवर, त्या पतपत्रामधील अटींनुसार तपशील तपासून पाहण्याचे दायित्व नसते. त्यामुळे असे करणे हे अनावश्यक असून पतपत्र देण्याच्या हेतूच निष्फळ ठरतो. डिस्काउंटिंग करणाऱ्या बँकांनी सहस्वीकार करणाऱ्या बँकांकडून, त्यांच्या एल/सी खाली काढलेल्या बिलाच्या सहस्वीकार करण्याबाबतचे कारण आधी स्पष्ट करुन घ्यावे आणि अशा व्यवहारांच्या खरेपणाविषयी खात्री पटल्यानंतर, अशा बिलांचे डिस्काउंटिंग करण्याबाबत विचार करावा .*

*२.६.६ बिलांचा सहस्वीकार करतेवेळी, शाखेचे अधिकारी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करत आहेत ह्याबाबत खात्रीकरुन घेतली जावी. ह्याबाबतची जबाबदारी स्पष्टपणे निश्चित केली जावी आणि ह्या सूचनांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांबाबत कडक कारवाई केली जावी.*

**२.७ <u>पतपत्रांबाबत घ्यावयाच्या सावधानता</u>**

*२.७.१ नियमित ग्राहक नसलेल्या पक्षांच्या बाबत तसेच नियमित ग्राहक नसलेल्या लाभार्थींसाठी बँकांनी निधि-आधारित नसलेल्या किंवा अतिरिक्त/तात्पुरत्या सुविधा देऊ नयेत तसेच एलसींखाली काढलेली बिले डिस्काउंट करु नयेत. माल आयात करण्यासाठी असलेल्या एलसींबाबत, शिपिंग डॉक्युमेंट्सच्या आधारवर विदेशातील पुरवठेदारांना प्रदान करतेवेळी त्यांनी अत्यंत सावधानता ठेवावी. ग्राहकांनी तुलना करतेवेळी त्यांनी दक्षता व काळजी घ्यावी. ते कागदपत्र, एलसीच्या अटी व शर्तींनुसार काटेकोरपणे असल्यासच विदेशातील*

*पक्षांना प्रदान केले जावे. एलसींचा व्यवहार केला जाताना अनेक अनियमितता दिसून आल्या आहेत. जसे एलसी देणाऱ्या अधिकाऱ्यांद्वारे, त्या एलसींचे व्यवहार शाखेच्या पुस्तकात न नोदंविले जाणे; लाभार्थी व ग्राहक ह्यांच्या दरम्यान कट/संगनमत होऊन फसवून एलसी दिले जाणे अशा बाबतीत, गुन्हेगारी स्वरुपचा कट असल्यास, संबंधित अधिकारी, ज्याच्या वतीने एलसी उघडले होते तो ग्राहक आणि त्या एलसीचा लाभार्थी ह्यांच्या विरुध्द बँकेने कडक कारवाई करावी.*

*२.७.२ पतपत्रांखालील (एलसी) दाव्यांची तदजोड*

*(२) पूर्वीच्या आयडीबीआयने चालविलेली ही योजना आयडीबीआय बँक लि. चालवित आहे.*

*(३) पूर्वीच्या आयडीबीआयने चालविलेली ही योजना आयडीबीआय बँक लि. चालवित आहे.*

*एलसीखाली काढलेल्या बिलांचा मान न राखला गेल्यास, प्रदानाचे एक साधन म्हणून स्वीकार झालेल्या एलसी व संबंधित बिलांवर वाईट परिणाम होतोल. ह्यामुळे बँकांमधील प्रदान यंत्रणेची विश्वासार्हताही धोक्यात येईल व बँकांच्या प्रतिमेलाही धक्का बसू शकेल. ह्यासाठी बँकांनी, एलसीखाली असणारी दायित्वे पूर्ण करावीत व ताबडतोब प्रदान करावे.*

## बँक हमी बाँडचा आदर्श नमुना फॉर्म
(परिच्छेद २.२, ७.२)

### हमी बंधपत्र

१) भारताच्या राष्ट्रपतींनी (ज्यांना ह्यानंतर "सरकार" असे संबोधिले आहे), ------------------आणि ------------------ ह्या दरम्यान, दि. ------------------ रोजी झालेल्या करारनाम्यामधील (ज्याला ह्यानतर "तो करारनामा" म्हटले आहे) अटी व शर्तीनुसार, ------------------ ह्यांना (ज्याला ह्यानंतर "तो कंत्राटदार" म्हटले आहे), त्या कंत्राटदाराने, त्या करारनाम्यातील अटी व शर्ती पूर्ण केल्या असल्याने रु. ------------------ ची बँक हमी ठेवल्यास, सुरक्षा ठेवीच्या मागणीबाबत सूट देण्याचा विचार केल्याने, आम्ही, "ती बँक" म्हणून संदर्भित केलेली (येथे बँकेचे नाव द्यावे), ------------------ ह्यांच्या (तो कंत्राटदार) विनंतीनुसार, व त्या कंत्राटदाराने, त्या करारनाम्याच्या अटी व शर्ती न पाळल्यामुळे, सरकारला झालेल्या किंवा होऊ शकणाऱ्या, हानि किंवा नुकसानीसाठी, सरकारला, रु. ------------------ पेक्षा अधिक नसलेली रक्कम देण्याचे वचन देतो.

२) आम्ही ---------------------------------------- (येथे बँकेचे नाव द्यावे) येथे वचन देत आहोत की, सरकारने मागणी केल्यावर, ती मागणी केलेली रक्कम, त्या कंत्राटदाराने त्या करारनाम्यामधील अटी व शर्तीचे पालन न केल्यामुळे किंवा तो करार पूर्ण न केला गेल्यास सरकारला झालेल्या किंवा होऊ शकणाऱ्या हानि किंवा नुकसानीबाबत ह्या हमीखाली द्यावयाची भरपाई आहे असे सांगून, त्या रक्कमा, आम्ही विना - आक्षेप देण्याचे वचन देत आहोत. बँकेकडे केलेली अशी कोणतीही मागणी ही, बँकेने ह्या हमीखाली द्यावयाच्या रकमेच्या बाबतीत निर्णायक असेल. तथापि, ह्या हमीखाली असलेली आमची जबाबदारी ही रु. ------------------ पेक्षा अधिक रकमेची असणार नाही.

३) ह्याखाली असलेली आमची जबाबदारी स्वयंसिध्द व अस्पष्ट नसलेली असून, कंत्राटदाराने /पुरवठेदाराने कोणत्याही कोर्टात किंवा न्यायाधिकरणात त्याबाबत दावा दाखल केला असेल किंवा प्रलंबित असेल तरीही आम्ही अशी मागणी केलेली रक्कम सरकारला देण्याचे वचन देत आहोत.
ह्या बंधपत्राखाली केलेले असे प्रदान हे त्याखाली आमचे दायित्व पूर्ण केल्याचे वैध प्रमाण असेल आणि असे प्रदान केल्याबद्दल कंत्राटदार/पुरवठेदारांचा आमच्या विरुध्द कोणताही हक्क नसेल.

४) आम्ही ---------------------------------------- (बँकेचे नाव द्यावे), ह्यासही, राजी आहोत की, हा करार पूर्ण होण्यास लागणाऱ्या काळामध्ये ही हमी जारी व परिणामकारक असेल आणि ह्या करारनाम्याखाली किंवा कारणाने सरकारचे सर्व येणे पूर्णपणे दिले जाईपर्यंत व त्यांचे ह्याबाबत समाधान होईपर्यंत किंवा ------------------------- चे कार्यालय/ विभाग/ ---------------------------------- मंत्रालय ह्यांचेकडून ह्या करारनाम्याच्या अटी व शर्ती, त्या कंत्राटदाराने संपूर्णतया व योग्य रितीने पूर्ण केल्या असल्याचे प्रमाणपत्र देऊन ही हमी समाप्त करेपर्यंत जारी राहील. ----------------------- ह्या तारखेपर्यंत आमचेकडे ह्या हमीखाली लेखीस्वरुपात मांगणी किंवा दावा दाखल न केला गेल्यास त्यानंतर ह्या हमीखाली आमची सर्व जबाबदारी संपल्याचे समजण्यात येईल.

५) आम्ही, ------------------------------------------------------- (बँकएचे नाव द्यावे) सरकारकडे करतो की, आमच्या संमतीशिवायही व ह्या हमीखालील आमच्या दायित्वास धक्का न पोहोचेल अशा प्रकारे ह्या करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्ती बदलण्याचे तसेच, ह्या कंत्राटदाराद्वारे करावयाच्या कामाचा कालावधी वेळोवेळी वाढविण्याचे किंवा ह्या कंत्राटदाराविरुध्द सरकारच्या अधिकारांचा वापर, कोणत्याही वेळी किंवा वेळोवेळी लांबणीवर टाकण्याचे किंवा ह्या करारनाम्यामधील कोणत्याही अटी व शर्ती, माफ करण्याचे किंवा अंमलबजावणी करण्याचे स्वातंत्र्य सरकारला असून, अशा बदल, किंवा त्या कंत्राटदाराला दिलेली मुदतवाढ, किंवा माफी, किंवा सरकारने केलेला अपवाद किंवा त्या कंत्राटदाराला सरकारने दिलेली सवलत

*किंवा ही तरतुद वगळता, जामिनकीच्या कायद्याखालील कोणत्याही बाबीचा परिणाम आम्हाला ह्या हमीखालील दायित्वातून मुक्त करणार नाहीं.*

*६) ही बँक किंवा कंत्राटदार/पुरवठेदार ह्यांच्या घटनेत बदल झाल्यामुळे ही हमी समाप्त होणार नाही.*

*७) अंततः आम्ही, -------------------------------------------- (बँकेचे नाव), सरकारने लेखी स्वरुपात कळविल्याशिवाय, ही हमी, तिच्या अंमलात असलेल्या काळात आवाहित न करण्याचे वचन देत आहोत.*

*८) दिनांक ----------------- (दिनांक) ------------------ (महिना) ------------------ (वर्ष) रोजी ------------------ साठी (बँकेचे नाव.)*

जोडपत्र - २

*<u>ए.पी. डीआयआर मालिका, परिपत्रक क्र. २४ दि. नोव्हेंबर १, २००४ चे जोडपत्र</u>*
*<u>(परिच्छेद २.३, ८.३(४))</u>*

*एडीने दिलेली/आवाहित केलेली हमी/लेटर ऑफ अंडरटेकिंग/ लेटर ऑफ कंफर्ट ------------------ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी.*

| | | |
|---|---|---|
| एडीचे नाव | | संपर्क व्यक्ति |
| पत्रा | | टेलिफोन- |
| ई-मेल | | फॅक्स- |

**(युएसडी दशलक्ष)**

| | | |
|---|---|---|
| निवासी व्यक्तींच्या वतीने | हमी/लेटर ऑफ अंडरटेकिंग/लेटर ऑफ कंफर्ट दिलेली | |
| | बायर्स क्रेडिट | सप्लायरचे क्रेडिट |
| व्यापारी क्रेडिट्स (३ वर्षापेक्षा कमी)<br>अ) १ वर्षापर्यंत<br>ब) १ वर्षापेक्षा अधिक व तीन वर्षापेक्षा कमी**<br>(** भांडवली मालापुरते सीमित) | | |

| | | | |
|---|---|---|---|
| स्थळ - | | | प्राधिकृत स्वाक्षरीकर्त्याची सही |
| दिनांक - | शिक्का | | |

जोडपत्र-३

## “हमी व सहस्वीकार” ह्यावरील महापरिपत्रक एकत्रित केलेली परिपत्रके

| अनु क्र. | परिपत्रक क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| 1 | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ६९ | २७.०५.२०११ | विदेशातील थेट गुंतवणुक - उदारीकरण/ पुनर्मांडणी |
| 2 | मेल-बॉक्स क्लारिफ़िकेशन | १९.०५.२०११ | सहकारी बँकांच्या ग्राहकांना वाणिज्य बँकांव्दारे बँक हमी (बीजी) पतपत्र(एलसी) दिले जाणे |
| 3 | डीबीओडी.बीपी.बीसी.९६/०८.१२.०१४/२००९-१० | २३.०४.२०१० | पायाभूत सोयी क्षेत्राला द्यावयाच्या अग्रीम राशींवरील प्रुडेंशियल नॉर्म्स |
| 4 | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१३६/१३.०३.००/२००८-०९ | २९.०५.२००९ | बँकांव्दारे हमी दिल्या जाणे |
| 5 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१२७/२१.०४.००९/२००८-०९ | २२.०४.२००९ | हमीचा विस्तार – दहा वर्षां पलिकडिल परिपक्वता |
| 6 | मेल-बॉक्स क्लारिफ़िकेशन | १५.०४.२००९ | ऑटो रिन्युअल क्लॉज युक्त बँक हमी |
| 7 | मेल-बॉक्स क्लारिफ़िकेशन | २७.०५.२००८ | बँक हमी वर सही करणे |
| 8 | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.७२/१३.०३.००/२००६-०७ | ०३.०४.२००७ | निर्याती साठीच्या अग्रीम राशींसाठी हमी |
| 9 | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.५१/१३.०३.००/२००६-०७ | ०९.०१.२००७ | कमोडिटी मार्केट बाबत बँकांवरील जोखीम |
| 10 | अप(डीआयआर मालिका)परिपत्रक क्र.१३ | १७.११.२००६ | सेवा आयात करणाऱ्यांच्या वतीने बँक हमी देणे |
| 11 | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.३५/१३.०७.१०/२००६-०७ | ११.१०.२००६ | हमी व सह स्वीकार |
| 12 | ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.२९ | २७.०३.२००६ | विदेशात गुंतवणुक- उदारीकरण |
| 13 | फ़ेमा अधिसूचना क्र. ८/२०००-र्ब | ३/५/२००० | विदेशी मुद्रा व्यावस्थापन (हमी) विनियम, २००० |
| 14 | ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.२४ | ०१.११.२००४ | भारतात आयात करण्यासाठी ट्रेड क्रेडिट्स - हमी देणे - अधिकार देणे |
| 15 | ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र.१७ | १६.१०.२००४ | विदेशी विमान कंपन्यांच्या /आयएस ह्यांच्या लाभार्थ बँक हमी |
| 16 | फ़ेद मास्टर परिपत्रक क्र.८/२००४-०५ | ०१.०७.२००४ | महापरिपत्रक- माल व सेवांची निर्यात |
| 17 | फ़ेद मास्टर परिपत्रक क्र.७/२००४-०५ | ०१.०७.२००४ | महापरिपत्रक- माल व सेवांची निर्यात |
| 18 | डीबीओडी.बीपी.बीसी.क्र.९७/२१.०४.१४१/२००३-०४ | १७.०६.२००४ | २००४-०५ सालासाठी वार्षिक धोरण निवेदन- अप्रतिभूतित जोखमींवरील प्रुडेंशियल नॉर्म्स |
| 19 | आयईसीडी.क्र.१७/०८.१२.०१/२००२-०३ | ०५.०४.२००३ | हमी व सह स्वीकार |
| 20 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.४७/२१.०४.१४१/२००२ | १३.१२.२००२ | अप्रतिभूतित हमी व अग्रीम राशींची मर्यादा |
| 21 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.३९/२१.०४.१४१/२००२-०३ | ०६.११.०२ | स्वयंसेवा गटांना ,(एसएच जी) अप्रतिभूतित हमी व अग्रिम राशींच्या मर्यादे मधील गट हमी विरुध्द दिलेल्या अग्रिम राशींबाबत सूट |
| 22 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.९०/२१.०४.१४१/२००१-०२ | १८.०४.०२ | अप्रतिभूतित हमी व अग्रिम राशी संबंधीच्या नॉर्म्स मधून क्रेडिट कार्डांची थकबाकी वगळणे |
| 23 | आयईसीडी क्र १६/०८.१२.०१/२००१-०२ | २०.०२.०२ | पायाभूत सोयी प्रकल्पांना अर्थ – सहाय्य |
| 24 | डीबीओडी.बीपी.बीसी.११९/२१.०४१३७/२०००-०२ | ११.०५.०१ | इक्विटी व शेअर्स मधील गुंतवणुकी बाबत बँकांचे अर्थ सहाय्य - सुधारित मार्गदर्शक तत्वे |
| 25 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.७८/२१.०४.००९/९९ | ०४.०८.९९ | बँक हमी |
| 26 | आयईसीडी.क्र.२६/०८.१२.०१/९८-९९ | २३.०४.९९ | पायाभूत सोयी प्रकल्पांना अर्थ – सहाय्य |
| 27 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१६/२१.०४.००९/९७ | २८.०२.९७ | बँक हमी खालील प्रदान-प्रकरणांची तातडीने वासलात |
| 28 | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.९०/१३.०७.०५/९८ | २८.०८.९८ | शेअर्स व डिबेंचर्स विरुध्द बँकेचे अर्थसहाय्य |

| | | | |
|---|---|---|---|
| 29 | आयईसीडी.क्र.२१/०८.१२.०१/९६-९७ | २१.०२.९७ | पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन द्वारा (पीएफसी) चालित बिल डिस्काऊंटिंग / रिडिस्काऊंटिंग योजना |
| 30 | आयईसीडी.क्र.३७/०८.१२.०१/९४-९५ | २३.०२.९५ | वित्तिय संस्थांच्या लाभार्थ बँक हमी देणे |
| 31 | आयईसीडी.क्र.२१/०८.१२.०१/९४-९५ | ०१.११.९४ | स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (एस आयडीबीआय) |
| 32 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१९४/२१.०४.००९/ ९३ | २२.११.९३ | बँक हमी खालील प्रदान-प्रकरणांची तातडीने वासलात |
| 33 | डीबीओडी.क्र.बीसी.१८५/२१.०४.००९-९३ | २१.१०.९३ | बँक हमी - निवाड्यांच्या प्रमाणित प्रती मिळण्यातील विलंब |
| 34 | डीबीओडी.क्र.बीसी.२०/१७.०४.००१/९२ | २५.०८.९२ | बँकांमधील फसवाफसवी व गैर व्यवहाराबाबत चौकशी करण्यसाठी समिती |
| 35 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.५३/सी.४७३-९१ | २७.११.९१ | बँक हमी खालील प्रदान-प्रकरणांची तातडीने वासलात |
| 36 | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.३५/सी.९६ (झेड)-९० | २२.१०.९० | बँक हमी योजना |
| 37 | आयईसीडी.क्र.पीएमडी.बीसी.१२/सी.४४६ (सीःपी)-९०/९१ | २१.०९.९० | वित्तसंस्थांच्या लाभार्थ सहस्वीकार /हमी देणे- बायर्स लाईन ऑफ क्रेडिट योजना (वीएलसीएस) |
| 38 | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.११/सी.९६-८९ | ०९.०८.८९ | बँक हमी योजना |
| 39 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१२४/सी.४७३-८९ | ३१.०५.८९ | बँक हमी खालील प्रदान-प्रकरणांची तातडीने वासलात |
| 40 | डीबीओडी.क्र.इन्फ़.बीसी.७३/सी.१०९(एच)-८९ | १५.०२.८९ | बँक हमी योजना |
| 41 | आयईसीडी.क्र.प्म्स.२०७/सी.४४६ (सीःपी)-८७/८८ | २९.०६.८८ | कॉन्सोर्टयम धर्तीवरील अग्रिम राशी- नवीन गुंतवणुकींबाबत, बँका व आखिल भारतीय वित्तसंस्थांमध्ये समन्वय |
| 42 | आयईसीडी.क्र.एफ़्ड.१९७/८२२-व्म-मोड-८८ | ३०.०१.८८ | प्रकल्प निर्यात- भारतीय कंत्राटदारांना सुविधा देणे |
| 43 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.७१/सी.४७३-८७ | १०.१२.८७ | बँक हमी खालील प्रदान-प्रकरणांची तातडीने वासलात |
| 44 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.११/सी.४७३-८७ | १०.०२.८७ | आवाहित हमींचे प्रदान |
| 45 | डीबीओडी.सिक.बीसी.५ए/सी.७३९ (ए-१)-८७ | २९.०१.८७ | बँकांव्दारे पत पत्रांखाली काढलेल्या बिलांचा सहस्वीकार |
| 46 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१३०/सी.४७३-८६ | १५.११.८६ | बँक हमी |
| 47 | डीबीओडी.क्र.इन्फ़.बीसी.४५/सी.१०९(एच)-८६ | ०९.०४.८६ | बँक हमी योजना |
| 48 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.२८/सी.४६९(डबलयू)-८६ | ०७.०३.८६ | बँक संलेख इत्यादि देण्यासाठी सावधानता |
| 49 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१८/सी.४७३-८६ | २४.०२.८६ | बँक हमी |
| 50 | आयईसीडी.क्र.प्म्स.१२९/सी.४४६ (प्ल)-८५ | ११.१०.८५ | सी एएस - आयडिबिआय बिल्स रिडिस्काउंटिंग योजना |
| 51 | डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.१११/सी.४६९(डबलयू)-८५ | ०२.०९.८५ | बँक संलेख इत्यादि देण्यासाठी सावधानता |
| 52 | डीबीओडी.क्र.एलइजी.बीसी.७७/सी.२३५सी-८५ | ०५.०७.८५ | बँकिंग रेगुलेशन अधिनियम, १९४९ चे कलम २० |
| 53 | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.२५/सी.९६-८४ | २६.०३.८४ | वाणिज्य बँकांव्दारे आंतर कंपनी ठेवी/कर्जे ह्याबाबतची हमी |
| 54 | आयईसीडी.क्र.कॅड.८२/सी.४४६(एचएफ-पी)-८४ | ०२.०२.८४ | राज्य गृहनिर्माण मंडळे व तत्सम संस्थांना दिलेल्या कर्जाबाबत, बँकांनी हुडकोच्या लाभार्थ दिलेली हमी |
| 55 | डीबीओडी.क्र.ग्क.सिक.बीसी.९७/सी.४०८ (ए)-८३ | २६.११.८३ | बँकांव्दारे पतपत्रे उघडणे, हमी देणे, व बिलांचा सहस्वीकार करणे. |
| 56 | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.४४/सी.९६-८३ | ३०.०५.८३ | वाणिज्य बँकांव्दारे आंतर कंपनी ठेवी/कर्जे ह्याबाबतची हमी |
| 57 | डीबीओडी.क्र.बीपी.६७८/सी.४७३-८३ | ११.०१.८३ | वाणिज्य बँकांव्दारे आंतर कंपनी ठेवी/कर्जे ह्याबाबतची हमी |
| 58 | डीबीओडी.क्र.क्ल्ग.बीसी.९१/सी.१०९(एच)-८२ | ३०.०९.८२ | बँक हमी योजना |
| 59 | इक्ड.क्र.कॅड.१८/सी.४४६-८२ | १०.०२.८२ | बँक हमी स्वीकार करणे |
| 60 | डीबीओडी.क्र.इन्फ़.बीसी.१०३/सी.१०९-८० | ११.०९.८० | बँक हमी योजना |
| 61 | डीबीओडी.क्र.क्ल्ग.बीसी.२१/सी.१०९(एच)-८० | ०८.०२.८० | बँक हमी योजना |
| 62 | डीबीओडी.क्र.डीआयआर .बीसी.१२२/सी.१०७(एन)-७८ | २०.०९.७८ | वाणिज्य बँकांव्दारे आंतर कंपनी ठेवी/कर्जे ह्याबाबतची हमी |
| 63 | डीबीओडी.क्र.क्ल्ग.बीसी.१/सी.१०९-७८ | ०२.०१.७८ | बँक हमी योजना |
| 64 | डीबीओडी.क्र.एक्क.बीसी.७७/सी.२९७एल(१-ए)-७७ | ०७.०६.७७ | भारतीय निर्यातदारांच्या वतीने, भारतीय बँकांनी, विदेशातील कर्मचारी/ आयातदारांच्या नावे दिलेली विना अट हमी |
| 65 | डीबीओडी.क्र.एक्क.बीसी.८९/सी.२९७एल(१-डी)-७६ | ०४.०८.७६ | बिड बाँडस् व परफॉर्मन्स हमी |
| 66 | डीबीओडी.क्र.फ़ोल.बीसी.९/सी.२४९-७६ | २०.०१.७६ | आंतर कंपनी ठेवी/कर्जे ह्यावर, वाणिज्य बँकांव्दारे बिलांचा सहस्वीकार/हमी |

| | | | |
|---|---|---|---|
| 67 | डीबीओडी.क्र.ग्क्स.बीसी.२५/सी.१०७(एन)-७४ | ०१.०४.७४ | वाणिज्य बँकांव्दारे आंतर कंपनी ठेवी/कर्जे ह्याबाबतची हमी |
| 68 | डीबीओडी.क्र.श.बीसी.८८/सी.९६(एस)-७२ | १०.१०.७२ | क्रेडिट गॅरेंटी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया व्दारे हमी दिलेल्या अप्रतिभूतित अग्रिम राशी |
| 69 | डीबीओडी.क्र.बीएम.बीसी.८१/सी.२९७(पी)-७२ | १४.०९.७२ | बिड बाँडस् व परफॉर्मन्स हमी |
| 70 | डीबीओडी.क्र.श.बीसी.६८/सी.१०९-७२ | ३१.०७.७२ | बँक हमी योजना |
| 71 | डीबीओडी.क्र.श.बीसी.२७/सी.९६(एस)-७२ | २४.०३.७२ | अप्रतिभूतित अग्रिम राशी/ हमी संबंधीच्या नॉर्म्स साठी, देशांतर्गत डी/ए बिलांच्या बाबतीत सूट सुरु ठेवणे. |
| 72 | डीबीओडी.क्र.श.बीसी.१६१०/सी.९६(एस)-७० | २३.१०.७० | अप्रतिभूतित अग्रिम राशी व हमी |
| 73 | नट २००२/सी.४७३-७० | २९.७.७० | हमीं चा विचार करणे/ न करणे ह्याबाबतची मार्गदर्शक तत्वे |
| 74 | डीबीओडी.क्र.श.बीसी.१०५१/सी.९६(एस)-६९ | ०१.०७.६९ | नॉर्म्ससाठी वगळण्यात येणाऱ्या, निर्यातदारांना कनसाईंनमेंट धर्तीवर दिलेल्या अप्रतिभूतित अग्रिम राशी |
| 75 | डीबीओडी.क्र.श.बीसी.१००१/सी.९६झेड-६९ | २३.०६.६९ | बँक हमी |
| 76 | डीबीओडी.क्र.श.बीसी.२३८१/सी.९६(झेड)-६८ | १४.०८.६८ | बँक हमी |
| 77 | डीबीओडी.क्र.श.बीसी.२३४२/सी.९६एस-६८ | ०८.०८.६८ | पुस्तकी कर्जा विरुध्द अग्रिम राशी |
| 78 | डीबीओडी.क्र.श.बीसी.४८१/सी.९६एस-६८ | ३०.०३.६८ | अप्रतिभूतित अग्रिम राशी |
| 79 | डीबीओडी.क्र.श.बीसी.४२१/सी.९६(एस)-६८ | १९.०३.६८ | अप्रतिभूतित अग्रिम राशी -राज्य/केंद्र सरकारांवर पुरवठ्या विरुध्द दिलेल्या अग्रिम राशी |
| 80 | डीबीओडी.क्र.श.बीसी.३५९/सी.९६एस-६८ | ०७.०३.६८ | अप्रतिभूतित अग्रिम राशी – ९० दिवसांचा युज्न्स असलेली इनलँड डी/ए बिले |
| 81 | डीबीओडी.क्र.श.बीसी.६८/सी.९६(एस)-६८ | १२.०१.६८ | अप्रतिभूतित अग्रिम राशी - मार्गदर्शक तत्वे |
| 82 | डीबीओडी.क्र.श.बीसी.१८५०/सी.९६झेड-६७ | ०७.१२.६७ | बँक हमी |
| 83 | डीबीओडी.क्र.श.बीसी.१७९४/सी.९६झेड-६७ | २९.११.६७ | बँक हमी |
| 84 | डीबीओडी.क्र.श.बीसी.१६९३/सी.९६एस-६७ | ०८.११.६७ | शेअर्स व अप्रतिभूतित अग्रिम राशीं विरुध्द दिलेल्या अग्रिम राशी- मार्गदर्शक तत्वे |
| 85 | डीबीओडी.क्र.श.बीसी.१२९६/सी.९६झेड-६७ | २१.०८.६७ | बँक हमी |
| 86 | डीबीओडी.क्र.श.बीसी.१०६९/सी.९६झेड-६७ | ११.०७.६७ | बँकांचा हमी व्यवसाय -मार्गदर्शक तत्वे - स्पष्टीकरण |
| 87 | डीबीओडी.क्र.श.बीसी.६६६/सी.९६झेड-६७ | ०३.०५.६७ | बँका ररीत असलेल्या हमी व्यवसायासाठी नॉर्म्स व मार्गदर्शक तत्वे |